# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ / फाल्गुन १९, १९४२ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) मुख्यमंत्री**<br>**(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**<br>**(३) गृहनिर्माण मंत्री**<br>**(४) नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६२**

---

## मुंबईतील सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आश्रय योजनेंतर्गत घरे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) * ७०१५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १४ मधील प्रश्न क्रमांक ५२०२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांसाठी मालकी तत्वावर उभारण्यात येणाऱ्या घरांबाबत महाराष्ट्र विधिमंडळ हिवाळी अधिवेशन, २०२० मध्ये उपस्थित करण्यात आलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना नगर विकास विभागाने सदर सफाई कामगारांना मालकी तत्वावर घरे देण्याचा महानगरपालिकेचा कोणताही विचार नसल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने शासन परिपत्रक क्र.सकाका-२०१५/सं.क्र.४२/नवि-३४, दिनांक १२ जून, २०१५ नुसार मुंबईतील सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे देण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विभागाकडून दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबईतील २८ हजार सफाई कामगारांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांसाठी आश्रय योजनेंतर्गत सेवासदनिका देण्यात येतात. तथापि, त्यांना मालकी हक्काची घरे देण्याचा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कोणताही विचार नाही असे सन २०२० च्या हिवाळी अधिवेशनात उपस्थित करण्यात आलेल्या विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्रमांक ५२०२ च्या अनुषंगाने कळविण्यात आले होते.

(२) सदर शासन निर्णयानुसार, मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी ४.०० या कमाल चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी ५० टक्के सदनिका सेवानिवासस्थाने म्हणून व उर्वरित ५० टक्के सदनिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत २५ वर्ष व त्यापेक्षा अधिक सेवा करुन सेवानिवृत्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांना अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत सदनिका उपलब्ध करुन देण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन विभागात एकूण २९,८१६ कायम सफाई कामगार असून सध्या असलेल्या सफाई कामगारांच्या वसाहतीच्या भूखंडावर आश्रय योजनेंतर्गत १४,००० घरे बांधण्याबाबतची महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच उर्वरित १५,८१६ सेवासदनिकांसाठी भूखंडाची कमतरता असल्यामुळे, सेवासदनिका

बांधणे शक्य होत नाही. यामुळे शासन परिपत्रक दिनांक १२/०६/२०१५ नुसार ५०% सदनिका डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना जागेअभावी मालकी हक्काने मोफत सदनिका उपलब्ध करुन देणे महानगरपालिकेच्या तुर्तास विचाराधीन नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## परभणी शहर पाणीपुरवठा योजनेत अनियमितता झाल्याबाबत

**(२) * ६८५९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ५११० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिकेने युआयडीएसएसएमटी या योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी लागणारी जमीन संपादित न करताच पुढील प्रक्रिया केल्याने १३१ कोटी रूपयांचा निधी ५ वर्षापेक्षाही अधिक कालावधीसाठी अडवून ठेवल्याप्रकरणी महालेखापाल, नागपूर यांनी आक्षेप नोंदविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यापूर्वीच जागेची उपलब्धता व इतर तांत्रिक बाबी पूर्ण करणे बंधनकारक असून पाणीपुरवठा योजनेच्या कामाकरीता जागा उपलब्ध नसताना खोटी माहिती देवून प्रस्ताव तयार करणे, पाईप खरेदीत गैरव्यहार करणे, निविदेचे तुकडे पाडणे इत्यादी गैरप्रकार झाले असूनही तत्कालीन अधिकारी व इतरांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने ही योजना विहित मुदतीत कार्यान्वित होऊ शकली नसल्यामुळे मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशान्वये सदर प्रकरणात जबाबदार ठरलेले अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी करण्याची कार्यवाहीची पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर विभागीय चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सर्व दोषींकडून आर्थिक भुर्दंड वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली, त्याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महालेखापाल, नागपूर यांनी केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्पातील जलशुध्दीकरण केंद्राची जागा संपादन करण्यास उशीर झाल्याबाबत लेखा आक्षेप नोंदविला होता, हे खरे आहे.

उपस्थित केलेल्या आक्षेपावर परभणी महानगरपालिकेमार्फत दिनांक १२/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये महालेखापाल, नागपूर यांच्याकडे सविस्तर माहिती सादर करण्यात आलेली आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी एकूण ७ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द दोषारोपपत्र बजावण्यात आले आहे.

तसेच, प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

-----------------

## वाशिम शहरामधून पुसदकडे जाणाऱ्या मार्गावरील उड्डाणपुलाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(३) * ७३०२ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम शहरामधून पुसदकडे जाणाऱ्या मार्गावरील उड्डाणपुलाचे काम गत तीन वर्षापासून अपुर्णावस्थेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर उड्डाणपुलाचे काम जलदगतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विषयांकित उड्डाणपुलाचे काम करताना अनेक अडचणी आल्या असल्याकारणाने तसेच रेल्वे विभागाने त्यांच्या हद्दीतील पूलाचे बांधकाम पूर्ण न केल्यामुळे सदर कामासंबंधी कंत्राटदारास मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर उड्डाणपुल हा रेल्वे क्रॉसिंगवरील उड्डाणपुल असून उड्डाणपुलाचे रेल्वे हद्दीतील पुलाचे काम रेल्वे विभागाकडून कार्यान्वित करण्यात येत असून पोचमार्गाचे व लगत रस्ता हद्दीतील दोन्ही कडील गाळयाचे बांधकाम सा.बां.विभाग, वाशिम अंतर्गत प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत रेल्वे विभागाकडून त्यांच्या हद्दीतील पुलाचे बांधकाम चालू असल्यामुळे सदर बांधकाम पूर्ण होईपर्यंत सा.बां. विभागाच्या वावमधील उड्डाणपुलाचे बांधकाम करता येत नसून काम जलदगतीने पूर्ण करण्यासंबंधी रेल्वे विभागाकडे पाठपूरावा सुरू आहे. विषयांकित उड्डाणपुलाचे बांधकाम हे जून, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेतील कोरोनाबाधित कर्मचाऱ्यांना उपचारादरम्यान झालेल्या खर्चाचा परतावा मिळण्याबाबत

**(४) * ६७८५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ४८६४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेत कर्तव्यावर असताना कोरोनाबाधित झालेल्या कर्मचाऱ्यांचा उपचारादरम्यान झालेल्या खर्चाचा परतावा मिळण्याची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत कर्मचाऱ्यांच्या १२ वारसदारांनी सादर केलेल्या दस्तऐवजानुसार, संचालक, आरोग्य सेवा यांचेकडे आर्थिक मदतीसाठी सादर प्रस्तावातील ०५ प्रस्ताव संचालनालयाने अपात्र ठरविले असून, ०७ प्रस्ताव निर्णयासाठी प्रस्तावित आहेत तर, ०६ मृतक कर्मचाऱ्यांच्या वारसदारांकडून आवश्यकत्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्याची महानगरपालिकास्तराव सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रलंबित प्रकरणे निकाली काढून कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाचा परतावा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

महापालिकेत कोविड कालावधीत कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या उपचारावरील खर्चाची संपूर्ण देयके निकाली काढलेली असल्याने, कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

(२), (३) व (४) आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांच्याकडे दिनांक ०८/१२/२०२० रोजी प्रलंबित असलेले ०७ प्रस्ताव “मयताची सेवा कोविड रुग्ण सेवाशी प्रत्यक्ष निगडीत नसल्याचे दिसून येत आहे” या कारणास्तव नमूद योजनेच्या अटी व शर्तीमध्ये त्यांची सेवा समाविष्ट नसल्याने, अपात्र घोषित करुन, सहसंचालक, आरोग्य सेवा यांनी मनपाकडे परत पाठविले आहेत.

०६ मृतक कर्मचाऱ्यांच्या वारसदाराकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर, सहसंचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचेकडे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहेत.

या कर्मचाऱ्यांना वित्त विभागाच्या दिनांक २९/०५/२०२० च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन रुपये ५० लाखाचे विमा कवच/अनुदान लागू करण्याची बाब शासनाचे विचाराधीन आहे.

-----------------

## हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये करण्याबाबत

**(५) * ७२१६ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ४५५६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरखेड (ता.तेल्हारा, जि.अकोला) येथे नगरपंचायत स्थापन करणेबाबत हिवरखेड विकास मंच व लोकजागर मंच, हिवरखेड यांनी दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना विनंती अर्ज सादर केला आहे तसेच ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तेल्हारा यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांना दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी पत्रान्वये कळविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना प्रस्तावासंदर्भात असलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यास सांगितले असून त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित यंत्रणांचे अहवालासह प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिवरखेड ग्रामपंचायत क्षेत्रात शाळा, माध्यमिक शाळा, राष्ट्रीयकृत बँका, पोस्ट ऑफीस, कृषी उत्पन्न बाजार समिती, तेल्हारा (उपबाजारपेठ), सहकारी बँक, खरेदी विक्री संस्था, बी.एस.एन.एल. केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र इत्यादी महत्वाची कार्यालये असल्याने मागील दहा

वर्षापासून लोकसंख्येमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने हिवरखेड क्षेत्राचा विकास होण्याच्यादृष्टीने हिवरखेड येथील प्रस्तावित महसूली क्षेत्रास नगरपंचायतीचा दर्जा मिळण्याबाबतचा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडील प्राप्त प्रस्ताव जिल्हाधिकारी यांनी पुढील कार्यवाहीस्तव प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने हिवरखेड ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अकोला जिल्ह्यातील हिवरखेड येथे नगरपंचायत स्थापन करण्याबाबत हिवरखेड विकास मंच व लोकजागर मंच हिवरखेड यांनी दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ रोजी जिल्हा परिषद, अकोला यांच्याकडे विनंती अर्ज सादर केला, ही बाब खरी आहे.

यासंदर्भात तहसिलदार तेल्हारा यांनी दिनांक १०/१२/२०२० व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, अकोला यांना प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे.

(३) व (४) हिवरखेड ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला होता.

प्रस्तावाची तपासणी केली असता प्रस्तावासोबत ग्रामपंचायत/ ग्रामसभा यांचा ठराव, नगरपंचायतीत समाविष्ट करावयाचे एकूण क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांकाची यादी याबाबतचे परिशिष्ट-अ तसेच प्रस्तावित नगरपंचायतीच्या सीमा दर्शविणारे परिशिष्ट-ब, नकाशा ही माहिती/कागदपत्रे नसल्याने दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये ती सादर करण्याचे जिल्हाधिकारी, अकोला यांना कळविण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी, अकोला यांनी उपरोक्त प्रमाणे माहिती सादर करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना दिनांक १/२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले असून त्यांचा प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे, असे जिल्हाधिकारी, अकोला यांनी शासनास कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय सेवेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६) * ७४९० श्री.अरुण लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय सेवेतील सध्या एक लाखापेक्षा जास्त पदे रिक्त असून सुशिक्षित आणि होतकरू तरुण वर्ग महाराष्ट्र लोकसेवा आयोग वर्ग-१, वर्ग-२ आणि वर्ग ३ च्या सेवा भरती प्रक्रियेवर अवलंबून असून राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांची मोठी संख्या लक्षात घेता शासनाने सन २०२१ मध्ये शासकीय सेवेत रिक्त असलेल्या एक लाखांपेक्षा जास्त पदांसाठी सुधारित महापोर्टल तयार करून भरतीप्रक्रिया सुरु करावी अशी शिफारस तत्कालीन विधानसभा अध्यक्ष महोदयांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास आरक्षणाला तसेच मराठा आरक्षणाला मा.सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिल्यानंतर शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या, या परीक्षा घेण्यासंदर्भात आणि यापूर्वी झालेल्या परीक्षांचे निकाल, मुलाखती, शारीरिक चाचण्या संदर्भातील कार्यवाहीबाबत एमपीएससीच्या तीन पत्रांना शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने काहीच प्रतिसाद दिला नसल्याचे “एमपीएससी स्टुडंट राईट्स” चे श्री.महेश बडे यांनी माहितीच्या अधिकारात दाखल केलेल्या अर्जाला एमपीएससीने दिलेल्या उत्तरातून सदर वस्तुस्थिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील लाखो उमेदवार व त्यांचे पालक एमपीएससी परीक्षा कधी होणार या चिंतेत असून आठ ते नऊ उमेदवारांनी नैराश्यात येऊन आत्महत्या देखील केल्यामुळे शासनाने या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून उक्त परीक्षा आणि प्रक्रियेची कार्यवाही करण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला काही सूचना किंवा शिफारशी केल्या आहेत काय,

(४) तसेच राज्यातील युपीएससीची परीक्षा प्रक्रिया एमपीएससी प्रमाणे एक वर्षाचे आत घेवून परीक्षांचा निकाल वेळेत लावण्यासाठी शासनाने उपाययोजना करुन कोविड-१९ मुळे वयोमर्यादा संपलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत धोरण आखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच उपरोक्त प्रकरणी प्राप्त झालेल्या शिफारसी अन्वये शासकीय सेवेतील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) तत्कालीन सन्माननीय विधानसभा अध्यक्ष महोदयांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास केलेली शिफारस अभिलेखात आढळून आली नाही.

तथापि, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाच्या शासन निर्णय, दिनांक २१ जानेवारी, २०२१ अन्वये महापरीक्षा पोर्टल अंतर्गत घेण्यात येणाऱ्या परीक्षा पध्दतीत आवश्यक बदल करुन सुधारीत परीक्षा पध्दतीनुसार सर्व्हिस प्रोव्हायडरची निवड करण्यात आली आहे.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिनांक १६/०९/२०२० च्या पत्रास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १२/०१/२०२१ च्या पत्रान्वये उत्तर दिले आहे.

(३) यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सूचना किंवा शिफारशी करण्यात आलेल्या नाहीत.

(४) शासन सेवेतील प्रवेशाकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २५/०४/२०१६ अन्वये खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे इतकी उच्चतम वयोमर्यादा विहित करण्यात आली आहे. ही वयोमर्यादा केंद्र शासनाच्या सेवेतील प्रवेशाकरीता

विहित करण्यात आलेल्या कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त आहे. याशिवाय करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने देखील त्यांच्या सेवांमधील प्रवेशाकरीता वयोमर्यादा वाढविल्याचे आढळून आले नाही. सबब, राज्य शासनाच्या सेवेतील प्रवेशाकरीता या कमाल वयोमर्यादेत वाढ करण्यात आलेली नाही. तसा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आलेला आहे.

(५) यासंदर्भात शासनाने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईदर महापालिकेच्या शिक्षण विभागाने निवृत्त शिक्षकांना निवडश्रेणीपासून वंचित ठेवल्याबाबत

**(७) * ६४९१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईदर महापालिकेच्या शिक्षण विभागाने ७० निवृत्त शिक्षकांना हक्काच्या निवडश्रेणीपासून वंचित ठेवल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवृत्त शिक्षकांची ८० वर्षे उलटून गेली तरी त्यांना निवडश्रेणीसाठी महापालिकेकडे वारंवार जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर निवृत्त शिक्षकांना निवडश्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) दिनांक २२/०२/१९९४ रोजी जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडील २८ प्राथमिक शाळा व १९२ शिक्षक मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले होते.

सदर शिक्षकांची सेवापुस्तके मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळास प्राप्त झाल्यानंतर काही सेवापुस्तकात ३ रा, ४ था व ५ वा वेतन आयोग लागू केल्यानंतर वेतन पडताळणीत त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत एकूण १४९ सेवानिवृत्तिधारक असून त्यांना निवडश्रेणीचा लाभ देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

ज्या सेवापुस्तकात त्रुटी आढळून आलेल्या आहेत, अशा सेवापुस्तकांची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र लेखाधिकारी नेमला असून, सेवानिवृत्त शिक्षकांना निवडश्रेणी लागू करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मे.आरएनए विकासकाने लिबर्टी प्रकल्पातील तळमजल्यावर रहिवाशी वापराच्या ऐवजी वाणिज्य वापर केल्याबाबत

**(८) * ७४९४ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे.आरएनए विकासक यांच्या सर्व्हे नंबर २२५, मौजे पेणकर पाडा, आरएनए लिबर्टी प्रकल्पातील मंजूर नकाशाप्रमाणे तळमजल्यावर रहिवाशी वापराच्या ऐवजी वाणिज्य वापर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या विकासकावर तसेच अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत सहायक संचालक/नगररचना तसेच पदनिर्देशित अधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका ह्यांनी दोषी विकासकावर एमआरटीपी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे पेणकर पाडा, स.क्र. २२५ (जुना), ५७ (नवीन) या जागेत विकासक, मे.आरएनए बिल्डर्स यांच्या मंजूर आरएनए लिबर्टी प्रकल्पातील मंजूर नकाशानुसार

इमारतीच्या तळ मजल्यावर भागश: रहिवास वापर दर्शविलेला आहे. तथापि, तळमजल्यावरील सर्व सदनिकामध्ये वाणिज्य वापर सुरू आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदी अन्वये महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कार्यवाही सुरू असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, पंढरपूरसाठी नमामी चंद्रभागा ही महत्वकांक्षी योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(९) * ७२५४ श्री.प्रशांत परिचारक, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नमामी गंगे योजनेच्या धर्तीवर सन २०१६ मध्ये तत्कालीन शासनाने राज्यात नमामी चंद्रभागा सारखी महत्वकांक्षी योजना सुरु केली, मात्र सद्यःस्थितीत सदर योजनेच्या कामासंदर्भात कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी व धोरणात्मक निर्णय होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, पंढरपूरसाठी ही योजना फार महत्वाची असल्यामुळे तेथील जलशुध्दीकरण प्रकल्प व नदीत होणारे प्रदूषण रोखण्यासंबंधीचे नियोजन करण्याकरीता नमामी चंद्रभागा प्राधिकरणाच्या पूर्व नियोजनामुळे सदर योजना अतिशय उपयुक्त ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करुन नमामी चंद्रभागा प्राधिकरणासंबंधीचे सुधारित धोरण ठरवून योजना तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) नगर विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ अन्वये नमामी चंद्रभागा अभियानांतर्गत सन २०२२ पर्यंत चंद्रभागा नदी निर्मळ, पवित्र व प्रदूषणमुक्त करुन तिचे संवर्धन करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नमामी चंद्रभागा प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. तसेच मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी दिनांक २१/६/२०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली कृती गट स्थापन करण्यात आला. सदर कृती गटाच्या दिनांक ६/९/२०१७, दिनांक २४/४/२०१८ व दिनांक २९/१०/२०१८ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या. तसेच मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समितीची बैठक दिनांक १५/२/२०१८ रोजी आयोजित करण्यात आली.

प्राधिकरणांतर्गत कामे करण्याकरीता शासनाने रुपये १६.८० कोटी इतका निधी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे सुपूर्द केला आहे.

शासनाकडून प्राप्त रुपये १६.८० कोटी निधीपैकी आतापर्यंत विविध प्रयोजनावर रुपये ७२.९७ लक्ष इतका खर्च झाला आहे.

सदर प्रकल्पामध्ये भीमा (चंद्रभागा) नदी व तिच्या उपनद्यांच्या काठावर असलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच पुणे व सोलापूर जिल्ह्यातील एकूण १० नगरपरिषदा, ३ कटक मंडळे व ग्रामपंचायती यांचा समावेश आहे. या सर्व प्राधिकरणातील घनकचऱ्याचे सुनियोजित व्यवस्थापन व मलनि:स्सारण व्यवस्थापन या बाबीं यामध्ये समाविष्ट आहेत.

सदर प्रकल्पामध्ये समाविष्ट महानगरपालिका/नगरपालिका/गांवे यांच्या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी नगरोत्थान योजना, अमृत योजना इत्यादी योजनांमधून विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

उपरोक्त निधीमधून पुणे जिल्ह्यातील ५ गावांचे व सोलापूर जिल्ह्यातील ५ गावांचे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे रुपये २०,९४,५००/- व जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे रुपये ३० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संभाजीनगर शहर (जि.औरंगाबाद) येथील गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून सदनिकांचा ताबा मिळण्याबाबत

**(१०) * ६६३१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संभाजीनगर शहर (जि.औरंगाबाद) येथील गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून (म्हाडा) अत्यल्प उत्पन्न गट धारकांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नक्षत्रवाडी येथे २४० सदनिकांचा ताबा सदनिकाधारकांना मिळाला नसल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षापूर्वी बँकेकडून कर्ज घेऊन सदनिकाधारक सदनिकेकरीता हप्ते भरत असूनही घरांचा ताबा मिळाला नसल्याने त्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदनिकांचा ताबा मिळण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदनिकाधारकांना घरांचा ताबा कधीपर्यंत मिळणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नक्षत्रवाडी जि.औरंगाबाद येथील २४० घरकुलांच्या प्रकल्पास केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) मंजूरी दिली आहे. सदर योजनेतील सदनिकेची विक्री किंमत पाच हप्त्यात भरण्याबाबत व कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत कळविण्यात आले होते. त्यानुसार ज्या अर्जदारांनी आवश्यक रकमेचा भरणा केला आहे व कागदपत्रांची पूर्तता केली आहे, अशा पात्र अर्जदारांना घरकुलांचा ताबा दिनांक २२/०९/२०२० पासून देण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत १६० घरकुलांचे वाटपपत्र दिले असून त्यापैकी १५५ घरकुलांचा ताबा देण्यात आला आहे. उर्वरित अर्जदारांना आवश्यक बाबींची पूर्तता केल्यानंतर घरकुलांचा ताबा देण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांजुरमार्ग (मुंबई) येथील कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ कारशेड प्रकल्पाचे काम विलंबाने होत असल्याबाबत

**(११) * ६५३८ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पाचा आरे वसाहतीत उभारावयाचा कारशेड प्रकल्प रद्द करुन तो कांजुरमार्ग येथे उभारण्याचा शासनाने निर्णय घेतल्यानंतर व कारशेड उभारण्याच्या कामास सुरुवात केल्यानंतर सदर जागेवर केंद्र शासनाने दावा केला असून या कारशेड उभारणीच्या कामास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर बांधकाम व्यावसायिक श्री.महेश गोराडिया यांचाही दावा असून याबाबतचा वाद सन २०१७ पासून दिवाणी न्यायालयात प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने आता मेट्रो-३ प्रकल्पाच्या कारशेडच्या कांजुरमार्ग येथील कामास स्थगिती दिलेली असल्यामुळे प्रकल्पाचे काम बंद ठेवण्यात आल्यामुळे प्रकल्पावर त्याचा विपरीत परिणाम होऊन खर्चातही वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कारशेड प्रकल्पासाठी कांजुरमार्ग येथील घेण्यात आलेली जमीन नेमकी कोणाच्या मालकीची आहे हा वाद मिटवून सदर प्रकल्पाचे काम सुरु होण्याकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांनी त्यांच्या दिनांक १ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या आदेशान्वये मौजे कांजुरमार्ग, ता.कुर्ला येथील जमिनीचा आगाऊ ताबा मेट्रो कारशेड व अनुषंगिक प्रयोजनार्थ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दिला होता. दरम्यान, कांजुरमार्ग

येथील जमिनीसंबंधी मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १६ डिसेंबर, २०२० रोजीच्या अंतरिम आदेशाव्दारे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांच्या उक्त आदेशाच्या अंमलबजावणीस व सदर जमिनीवर सुरु असलेल्या कामास स्थगिती दिली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे कांजुरमार्ग येथील मुंबई मेट्रो मार्गिका-३, ४ व ६ यांचे एकात्मिक कारशेड तसेच मार्गिक-६ व प्रस्तावित मार्गिका १४ यांच्या आंतरबदल स्टेशनांची सुसाध्यता व अनुषंगिक फायदे विचारात घेऊन दिनांक १० ऑक्टोबर, २०२० रोजी पार पडलेल्या बैठकीमध्ये मुंबई मेट्रो मार्गिका-३ व ६ यांचे एकत्रिकरण करुन दोन्ही मार्गासाठी कांजुरमार्ग येथे कारशेड डेपो उभारण्याबाबत तत्वत: मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचा विस्तृत प्रकल्प अहवाल प्राप्त झाल्यानंतर खर्चामध्ये होणाऱ्या वाढीबाबतची माहिती उपलब्ध करुन देता येईल.

(४) व (५) मुंबई मेट्रो प्रकल्पांच्या कारशेडकरीता पर्यायी जागा निश्चित करण्यासाठी राज्य शासनास शिफारस करण्याकरीता मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने अहवाल शासनास सादर केला असून सद्य:स्थितीत अहवाल शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील सर्व नगरपरिषदांमधील कर्मचाऱ्यांना सहायक वेतन अनुदान देण्याबाबत

**(१२) * ७४९२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व नगरपरिषदांमधील कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर व्हावा या हेतुने शासनाने सहायक वेतन अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सहायक वेतन अनुदान प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला सर्व शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना अदा होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून गत दोन वर्षापासून सहायक वेतन अनुदानाची रक्कम प्रत्येक महिन्याच्या २० तारखेनंतर दिली जात असून माहे डिसेंबर, २०२० या महिन्याचे वेतन दिनांक २६ डिसेंबर अखेरपर्यंत अदा करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नगरपरिषद कर्मचार्‍यांना सहायक वेतन अनुदान देण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये कार्यरत नगरपरिषद राज्य संवर्ग कर्मचारी तसेच, सदर नागरी स्थानिक संस्थाच्या आस्थापनेवरील कर्मचारी यांच्या वेतनासाठी स्वंतत्र वेतन अनुदान राज्य शासनामार्फत देण्यात येत नाही.

तथापि, दिनांक ३१/०८/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये नगरपरिषदा व नगरपंचायतींना सहायक अनुदान देण्यात येते.

सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार सहायक अनुदानाचा वापर प्राधान्याने कर्मचाऱ्यांच्या वेतन व निवृत्तिवेतनासाठी करणे आवश्यक आहे.

नगरपरिषद निधीतून वेतनासाठी कमी पडणाऱ्या रकमेसाठी राज्य शासनामार्फत देण्यात येणारे सहायक अनुदानाचा वापर होणे अभिप्रेत आहे.

संबंधित नगरपरिषदा व नगरपंचायतींनी त्यांचे स्व-उत्पन्न तसेच, शासनाचे सहायक अनुदान यानुसार कर्मचारी वेतन व भत्त्यासाठी आवश्यक असणारी आवश्यक रक्कम गठीत करुन प्रत्येक महिन्याचे वेतन विहित वेळेत अदा करणे अभिप्रेत आहे.

(३) व (४) अर्थसंकल्पीत होणारे सहायक अनुदान वितरणास वित्त विभागाकडून विहित पध्दतीने मान्यता मिळताच नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत नगरपरिषदा व नगरपंचायतींना वितरित करण्यात येते.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात विहित वेळेत सदर अनुदान प्राप्त झाल्याने ते वितरित करण्यात आले आहे.

तथापि, सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात कोविड-१९ मुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत वित्त विभागाकडून प्रत्येक महिन्याचे सहायक अनुदान हे त्या-त्या महिन्यात वितरित होत असल्याने, ते प्रत्यक्ष नगरपरिषदा व नगरपंचायतींना उपलब्ध होईपर्यंतच्या प्रक्रियेसाठी काही कालावधी लागला ही वस्तुस्थिती आहे.

माहे डिसेंबर, २०२० च्या सहायक अनुदान वाटपास काही तांत्रिक बाबींमुळे देयक मंजूरीस उशिरा मान्यता मिळाल्याने त्या महिन्याचे सहायक अनुदान प्रत्यक्ष वितरित होण्यास काहीसा विलंब झाला.

अर्थसंकल्पीत होणारे सहायक अनुदान वित्त विभागाकडून मान्यता मिळाल्यानंतर नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे वितरित होणे. त्यांचेमार्फत कोषागार कार्यालयाची मान्यता घेऊन नगरपरिषदा व नगरपंचायतींना अदा होणे अशी प्रक्रिया आहे. सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात कोविड-१९ मुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत निर्माण झालेल्या अडचणीमुळे एकत्रित अनुदान न मिळाल्याने सहायक अनुदान वितरणास सदर प्रक्रियेमुळे अधिकचा कालावधी लागला.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर महापालिकेने नियमबाहय कंत्राट दिल्याबाबत

**(१३) * ७२३३ श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महापालिकेच्या माध्यमातून तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांनी कोणतीही निविदा प्रक्रिया न राबवता पुण्याच्या सेंटर फॉर डेव्हलपमेंट ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी या कंपनीला ॲप व डॅशबोर्ड ह्या कामाचे नियमबाहय पध्दतीने कंत्राट दिल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी निविदा प्रक्रिया न राबवता मर्जीतील व हितसंबंध असणाऱ्या कंपनीला कार्यादेश देवून नियमबाह्य काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार/निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) (२), (३) व (४) नागपूर महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत, Letter and File Management System (LFMS Including Dashboard) आणि Grievance App (Nagpur Live City App Including Dashboard) बनविण्यासाठी रितसर दरपत्रके/आवदने बोलाविण्यात आली होती. ही दोन स्वतंत्र कामे होती.

Letter and File Management System (LFMS Including Dashboard) या कामासाठी प्राप्त ०३ दरपत्रके/आवेदनापैकी न्यूनतम (रुपये २,९७,३६०/-) दरपत्रक/आवेदनधारक मे.ड्रीमकेअर डेव्हलपर्स कन्सल्टींग टेक्नॉलॉजी, सोलापूर, यांना दिनांक २४/०२/२०२० रोजी साठी कंत्राट आदेश दिलेले आहेत.

तर, Grievance App (Nagpur Live City App Including Dashboard) या कामासाठी विहित दरपत्रक/आवेदने मागवून, प्राप्त ०३ दरपत्रक/आवेदनापैकी न्यूनतम (रुपये २,९७,३६०/-) दरपत्रक/आवेदनधारक मे.ड्रीमकेअर डेव्हलपर्स कन्सल्टींग टेक्नॉलॉजी, सोलापूर यांना सदरचे काम दिनांक ०६/०३/२०२० रोजी देण्यात आलेले आहे.

रुपये ०३ लक्षच्या आतील कामे असल्याने आणि याबाबतचे अधिकार आयुक्त, नागपूर मनपा यांना असल्याने, सदरची कामे आयुक्त यांच्या मंजुरीने देण्यात आलेली असून, या कामाच्या नियमबाह्यतेसंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार महापालिकेकडे प्राप्त झालेली नाही, असे महापालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

-----------------

## आर्वी नगरपरिषद (जि.वर्धा) येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१४) * ६९१६ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी नगरपरिषद (जि.वर्धा) येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर असलेल्या बांधकामास १२ महिने होवूनही निधी प्राप्त न झाल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शहरातील २,१२३ लाभार्थ्यांचे घराचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याने सदर आवासाकरीता त्वरीत निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) व (२) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्वी नगरपरिषद, जिल्हा वर्धा येथे केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) २१३३ घरकुलांना मंजूरी दिली आहे. सदर घरकुलांसाठी राज्य हिश्श्याचा रुपये १३०४.८० लक्ष व केंद्र हिश्श्याचा रुपये ६७७.४० लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्र.४ BLC अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना राज्य हिश्श्याचा निधी रुपये १ लाख महाराष्ट्र निवारा निधीतून सरसकट वितरित करण्याबाबत दिनांक ०१/०८/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच, केंद्र हिश्श्याच्या उर्वरित निधीबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाआयटी विभागाने मेगाभरतीकरीता काळ्या यादीत समावेश असलेल्या कंपन्यांची निवड केल्याबाबत

**(१५) * ६८२६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला सक्षम करण्याऐवजी महाआयटी विभागाने शासकीय सरळ सेवा मेगाभरती परीक्षा प्रक्रिया राबविण्याकरीता पात्र ठरविलेल्या चार खाजगी कंपन्यांपैकी दोन कंपन्या यापुर्वी इतर राज्यांमध्ये काळ्या यादीत समावेश (ब्लॅक लिस्टेड) करण्यात आलेल्या कंपन्या असूनही महाआयटी विभागाने त्यास मंजूरी दिल्याची बाब दिनांक २० डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परीक्षा प्रक्रियेसाठी देशातील विश्वासू कंपन्यांना डावलून महाआयटीमार्फत पात्र ठरविण्यात आलेल्या चारपैकी एका कंपनीला उत्तर प्रदेश शासनाने माहे मे, २०१९ मध्ये तर दुसऱ्या कंपनीला महाराष्ट्र राज्य परीषदेने माहे जून, २०२० मध्ये काळया यादीत समाविष्ट केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एखाद्या कंपनीचा काळ्या यादीत समावेश केल्यानंतर त्याच कंपनीला पुन्हा प्रक्रियेत सामावून घेण्याबाबत शासनाचे नेमके धोरण काय आहे, सदर धोरणाची सविस्तर माहिती काय आहे,

(४) तसेच सदर काळ्या यादीत समावेश असलेल्या बनावट कंपनीला कंत्राट दिल्यामुळे परीक्षा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होण्याची शक्यता वाढल्यामुळे उक्त परीक्षा प्रक्रियेसाठी नामांकीत कंपन्यांना कंत्राटे देऊन अद्यावत पोर्टलच्या उभारणीसाठी तसेच सरळ सेवेची भरती प्रक्रिया पारदर्शक

होण्याच्या दृष्टीकोनातून काळ्या यादीतील कंपनीवर कायमस्वरूपी बंदी घालण्याबाबत, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) व (२) महाआयटीने पाठविलेल्या माहितीनुसार त्यांनी प्रसिध्द केलेल्या निविदेत भाग घेतलेल्या सर्व कंपन्यांची तांत्रिक पडताळणी अतिशय काटेकोर पध्दतीने पार पाडण्यात आली आहे. तांत्रिक पडताळणी करीत असताना काळ्या यादीत नावे आढळलेल्या कंपन्यांना निविदा प्रक्रियेतून वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित कंपन्या ह्या कुठल्याही संस्थेमध्ये काळ्या यादीत समाविष्ट नाहीत अथवा काळ्या यादीतून वगळण्यात आल्या बद्दलचे पुरावे या कंपन्यांनी सादर केले आहेत व त्या नंतरच या कंपन्यांची निवड महाआयटी यांच्याकडून करण्यात आलेली आहे.

(३) असे कोणतेही शासनाचे धोरण नाही.

(४) व (५) निविदेतील अटींनुसार निवड झालेल्या कंपन्यांपैकी एखादी कंपनी प्राप्त पुराव्यांनुसार दोषी आढळल्यास त्या कंपनीस निवड यादीतून कमी करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

-----------------

## कर्जत नगरपरिषद (जि.रायगड) हद्दीत कोतवाल व्यायाम मंदिराच्या जागेवर अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत

**(१६) * ६३५१ श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत नगरपरिषद (जि.रायगड) हद्दीत कोतवाल व्यायाम मंदिराच्या जागेवर नव्याने होत असलेल्या अनधिकृत बांधकामा विरोधात त्वरीत कारवाई करण्याची मागणी कर्जत नाभिक समाज सामाजिक संस्थेमार्फत गत दीड वर्षापासून तहसिलदार, कर्जत तसेच मुख्याधिकारी, कर्जत नगरपालिका आदींकडे वारंवार लेखी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत सातत्याने तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्यामुळे दिनांक २ जानेवारी, २०२१ रोजी कर्जत मधील नाभिक समाज बांधवांनी दुकाने बेमुदत काळाकरीता बंद ठेवून टिळक चौक येथे आमरण उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अनधिकृत बांधकामासंदर्भात वारंवार तक्रारी करूनही सदर बांधकाम आजमितीस निष्कासित न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषींविरोधात कायदेशीर कारवाई करुन अनधिकृत बांधकाम विनाविलंब निष्कासित करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(२), (३) व (४) रायगड जिल्ह्यातील कर्जत नगरपरिषदेच्या हद्दीतील कोतवाल व्यायाम मंदिराच्या जागेवरील बांधकामास दिनांक १७/०६/२०२० रोजी कर्जत नगरपरिषदेने बांधकाम नकाशा मंजूर करुन बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यामुळे सदरचे बांधकाम अनधिकृत नसून त्याबाबतची वस्तुस्थिती नगरपरिषदेतर्फे वेळोवेळी तक्रारदारांना कळविण्यात आली आहे.

सदर बाबतीत तक्रारदार यांनी उपोषणास बसू नये म्हणून दिनांक ०१/०१/२०२१ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी घेण्यात आली होती. त्यानुषंगाने नगरपरिषदेतर्फे कागदोपत्री खुलासा सादर करण्यात आला आहे.

तसेच, तक्रारदारामार्फत उपोषणाचा इशारा दिल्यानंतर नगरपरिषदेमार्फत उपोषण न करण्याचे आवाहन करण्यात आले होते. तथापि, तक्रारदाराने यासंदर्भात उपोषण केले असल्याची वस्तुस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.

सदरचे बांधकाम अधिकृत असल्याने कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरात महापालिकेचे स्पेशालिटी हॉस्पिटल व स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय उभारण्याबाबत

**(१७) * ६४७१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक २८६९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात महापालिकेचे एकही स्पेशालिटी हॉस्पिटल व स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय नसल्याने रुग्णांना उपचार मिळण्यास अडचण येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरात चिखलठाणा औद्यागिक क्षेत्रात कोविड-१९ च्या रुग्णांसाठी २५० खाटांचे रुग्णालय तयार करण्याचे प्रस्तावित असून, सदर रुग्णालय संसर्गजन्य साथरोग रुग्णालय म्हणून कार्यान्वित होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०१६-२०१७ मध्ये स्वाईन फ्ल्यू, सन २०१८ मध्ये छावणी परिसरात डायरियाची साथ, सन २०१९ मध्ये डेंग्यूची साथ इ. रोगामुळे औरंगाबाद आरोग्य व्यवस्थेला फार मोठ्या संकटाचा सामना करावा लागल्यामुळे स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) औरंगाबाद महानगरपालिकेचे स्पेशालिटी हॉस्पिटल व स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय कार्यरत नसून, सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेमार्फत शहरातील रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) औरंगाबाद शहरात चिखलठाणा औद्योगिक क्षेत्रात कोविड-१९ च्या रुग्णांसाठी ३०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित असून, कोविडची साथ आटोक्यात आल्यानंतर सदर रुग्णालय हे पुढे मराठवाडा विभागाकरीता

साथरोग व संसर्गजन्य आजाराकरीता सुसज्ज असे रुग्णालय उभारण्याचे नियोजन असल्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर अग्निशमन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) * ६४९७ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर अग्निशमन विभागात ८७२ पैकी ६८२ पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी अग्निशमन कर्मचाऱ्यांकडे असताना देखील शासनाकडून उक्त प्रकरणी कोणतीही दखल घेतली जात नसल्यामुळे सदर विभागाला सक्षम करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करुन रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) नागपूर महानगरपालिकेच्या "अग्निशमन व आणिबाणी सेवा" विभागाच्या, १३ अग्निशमन केंद्राना व या केंद्रासाठी आवश्यक, एकूण वेगवेगळ्या ८७२ पदाच्या आकृतिबंधास दिनांक १२/०५/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

त्यापैकी ०९ अग्निशमन केंद्र सध्या कार्यरत असून, उर्वरित ०४ अग्निशमन केंद्रासाठीच्या आकृतिबंधास भविष्याची गरज ओळखून मंजूरी देण्यात आलेली आहे.

सध्या कार्यरत ०९ अग्निशमन केंद्राकरीता, आकृतिबंधानुसार मंजूर ६११ पदांपैकी १७९ पदे कार्यरत असून, ४३२ पदे रिक्त आहेत.

यात मुख्यत्वे, “अग्निशामक विमोचक” या सरळसेवेने भरती करावयाच्या पदाची २९९ इतकी पदे रिक्त असून, या पदासाठी सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक अर्हतेमध्ये अंशत: बदल करण्यासंदर्भातील नागपूर मनपाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

रिक्त पदांची भरती व त्यासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद या महानगरपालिकेशी संबंधित बाबी आहेत. महानगरपालिकांना वेतन/भत्त्यासाठी शासनाकडून निधी दिला जात नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने खुल्या प्रवर्गातील उमेदवारांवर अन्याय केल्याबाबत

**(१९) * ७३६४ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने उमेदवारांसाठी प्रवर्गानुसार कमाल संधीची मर्यादा निश्चित केली असून त्यानुसार यापुढे खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना सहा वेळा तर इतर मागासवर्ग प्रवर्गातील उमेदवारांना नऊ वेळा परीक्षा देता येईल तसेच अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गातील उमेदवारांना कमाल संधींची कोणतीही मर्यादा घालण्यात आलेली नसून एमपीएससी परिक्षेत ओबीसी व खुल्या प्रवर्गासाठी संधीची अट घातल्यामुळे ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांसाठी ही अट जाचक आणि अन्यायकारक असून घटनेचे उल्लंघन करणारी असल्याने तात्काळ मागे घ्यावी यासाठी राजूरा तहसिलदार (जि.चंद्रपूर) यांच्याकडे निवेदन देवून मागणी करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बदल सन २०२१ मध्ये होणाऱ्या सर्व परीक्षांसाठी लागू असतील तसेच जर उमेदवाराने पूर्व परीक्षेत भाग घेतला असेल तर त्याचा एक अटेंम्पट नोंदविला जाईल, तसेच पूर्व परीक्षेच्या कोणत्याही एका पेपरला उमेदवाराने हजेरी लावली तर त्याची ही संधी यापुढे ग्राह्य धरली जाणार असल्यामुळे एमपीएससीचा हा निर्णय खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी अन्यायकारक असून करिअरबाबत भेदभाव होत असल्यामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव येणार असल्याची भावना खुल्या प्रवर्गातील उमेदवारात निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात शासकीय पद भरतीची प्रक्रिया राबविण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासोबतच (एमपीएससी) "महाआयटी"ची नवी आयटी कंपनी प्रस्तावित आहे, मात्र दिनांक ४ मे, २०२० च्या पदभरती स्थगितीच्या शासन निर्णयात बदल झाल्याशिवाय सर्व विभागामध्ये पद भरती सुरु होणे शक्य नसल्यामुळे शासनाने सदर शासन निर्णयात बदल करुन पद भरतीवरची स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू परिस्थितीचा विचार करून ओबीसी व खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी कमाल मर्यादेच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्यास्तरावर विभिन्न स्पर्धापरीक्षांमध्ये भाग घेणाऱ्या उमेदवारांसाठी संधीची मर्यादा घालण्याबाबत दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी घोषणा केली आहे. भारतीय संविधानानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगास स्वायत्त दर्जा असून आयोगाने त्यांच्यास्तरावर घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आयोगासोबत शासनस्तरावर पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

(३) राज्यात कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावास आळा घालण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात महसूलावर मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. तसेच, राज्यात

कोरोनाबाधित रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर होत असलेली वाढ व त्या अनुषंगाने घातलेले अनेक निर्बंध यामुळे महसूल प्राप्त होत नाही. त्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन विविध उपाययोजना राबविण्याचा तसेच शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या बदली, भरतीवर निर्बंध घालण्याचा व इतर आवश्यक उपाययोजना करण्याचा निर्णय दिनांक ४ मे, २०२० च्या शासन निर्णयाव्दारे घेण्यात आलेला आहे. उपरोक्त परिस्थितीत बदल झालेला नसला तरी पद भरतीच्या अनुषंगाने त्या त्या विभागाच्या मागणीनुसार अत्यावश्यक पदे भरण्याबाबत शासनाने वेळोवेळी मान्यता दिली आहे.

(४) उपरोक्त उपप्रश्न क्र.२ प्रमाणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीतील तलावांची स्वच्छता करण्याबाबत

**(२०) * ७०५० श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीतील ४२ तलावांमध्ये कचरा साचल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कचऱ्यामुळे जीव सृष्टीस व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याने तलावांची स्वच्छता करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात एकूण ४१ तलाव असून कल्याण (पु.) विठ्ठलवाडी येथील तलाव शहराच्या मध्यवर्ती भागात आहे.

सदर तलावामध्ये कचरा साचल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये निदर्शनास आल्यानंतर सदर तलावाची साफसफाई करण्यात आलेली आहे.

विठ्ठलवाडी येथील तलावांची नियमित स्वच्छता व देखभाल करण्यासाठी ३ वर्षाकरीता महानगरपालिकेने ठेकेदाराची नियुक्ती केलेली आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील इतर तलावांची आवश्यकतेनुसार महानगरपालिकेमार्फत स्वच्छता करण्यात येत असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अडवली-भुतवली (महापे) व कोपरखैरणे येथील आदिवासी पाड्यातील नागरिक मूलभूत सुविधापासून वंचित असल्याबाबत

**(२१) * ७०९६ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) अडवली-भुतवली (महापे) व कोपरखैरणे येथील आदिवासी पाड्यातील नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी घरकुल योजनेंतर्गत महापालिकेच्यावतीने लाखो रुपये खर्चूनही आदिवासी पाड्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना कोणताही शासकीय लाभ मिळाला नसल्यामुळे ते कुडाच्या, काट्याच्या झोपड्यांमध्ये रहात असल्याने सदरहू दुरवस्था झालेल्या २२ झोपडीधारकांना महापालिकेमार्फत मोफत पक्की घरे बांधून देण्याचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहात गत चार ते पाच महिन्यापासून पाणी नसल्याचे निदर्शनास आले असून कामगारांकडून वेळच्यावेळी साफसफाई होत नसल्याने अनेक लोकांना उघड्यावर शौचाला जावे लागत असल्याच्या तक्रारी स्थानिक आदिवासी नागरिकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ठिकाणी स्मशानभूमीतील मृतदेह जाळण्याचा लोखंडी सांगाडा गंजून वाकलेल्या अवस्थेत असून आरसीसी गटाराची संख्या कमी असल्यामुळे घरातील सांडपाणी रस्त्यावरून वाहत असून डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, तसेच नागरी आरोग्य केंद्राची सोय नसल्यामुळे महिलांना प्रसुतीच्या वेळी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून प्रसुतीकरीता तीन किलोमीटर अंतरावरील महापे येथे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) अडवली-भुतवली येथील २२ झोपडीधारकांना नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत आदिवासी घरकुल योजनेंतर्गत पक्की घरे बांधून देण्यात येत आहेत.

सद्य:स्थितीत २२ घरांपैकी ०५ घरांचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित घरांचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत अडवली-भुतवली या ठिकाणी स्वच्छतागृहासाठी ०५ कंटेनर पध्दतीचे शौचालय असून त्यामध्ये १० बैठका उपलब्ध आहेत. तसेच ०१ पक्के स्वरूपाचे शौचालय असून त्यामध्ये ०८ बैठका उपलब्ध आहेत.

सदर स्वच्छतागृहांमध्ये २४ तास पाणी उपलब्ध होऊ शकेल याकरीता ५००० लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या बसविण्यात आलेल्या आहेत तसेच पाणी कमी पडू नये यासाठी बोअर वेलची देखील व्यवस्था करण्यात आलेली आहे.

स्वच्छतागृहांची देखभाल व दैनंदिन साफसफाई करणेकरीता कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांच्यामार्फत दिवसातून २ ते ४ वेळा साफसफाई करण्यात येते.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत सर्व स्वच्छतागृहांची दुरूस्ती करण्यात आलेली असून सर्व स्वच्छतागृहे सुस्थितीत आहेत.

(४) व (५) अडवली-भुतवली येथील स्मशानभुमीचे नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत नुतनीकरण करण्यात आलेले आहे. मृतदेह जाळणेसाठीचा लोखंडी सांगाडा तसेच स्मशानभुमीचे पत्रे नव्याने बसविण्यात आलेले आहेत.

या परिसरातील गटारांचे बांधकाम करण्यात आलेले असून, ज्या ज्या ठिकाणी गटारे तुटलेली होती त्यांची दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

अडवली-भुतवली या गावालगतच १ कि.मी. अंतरावर महापे येथे नागरी आरोग्य केंद्र कार्यरत असून नागरिकांना सर्व प्रकारच्या प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

अडवली-भुतवली या क्षेत्रातील नागरिकांसाठी रस्ते, गटार, पदपथ, पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान, दिवाबत्ती व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या असून यापुढेही त्या नियमित सुरू ठेवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) येथील कृषी उत्पन्न बाजार समिती यार्डातील भूखंडधारकांनी महसूल थकविल्याबाबत

**(२२) * ६७१७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य यार्डातील भूखंड धारकांनी नगरपरिषदेकडून नाव परिवर्तन व बांधकाम परवानगी न घेताच अनधिकृत बांधकाम करुन नगरपरिषदेचा लाखो रुपयांचा महसूल थकविला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य यार्डातील भूखंडाचा भाडेपट्टी करार करुन रितसर नगरपरिषदेकडे नाव परिवर्तनाची कार्यवाही करुन मालमत्ता नोंदणी पुस्तकात नाव नोंद करणे आवश्यक असतानाही बहुसंख्य भूखंड धारकांचे नाव परिवर्तन झालेले नसल्यामुळे उक्त नगरपरिषदेला मिळणारा महसूल थकित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य यार्डातील भूखंड धारकांविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

तथापि, नुकत्याच प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.

(२) अंशतः खरे आहे.

मुखेड नगरपरिषदेच्या मालमत्ता रजिस्टरमध्ये नावे नोंदविलेल्या मालमत्ता धारकांकडून कर वसूलीची कार्यवाही सुरु आहे. अन्य मालमत्ता धारकांचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) मुखेड नगरपरिषदेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, कृषी उत्पन्न बाजार समिती, मुखेड येथील मालमत्ता धारकांची माहिती मागविण्यात आली असून, सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही/चौकशी सुरु असल्याबाबत मुख्याधिकारी, मुखेड नगरपरिषद यांनी अहवाल सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सांडपाणी समुद्रात सोडण्यापूर्वी योग्य प्रक्रिया करण्याबाबत

**(२३) * ६६०२ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांडपाणी समुद्रात सोडण्यापूर्वी महापालिकेने त्यावर योग्य ती प्रक्रिया केल्यानंतर अरबी समुद्रात सोडावे तसेच सदर सांडपाण्यावर महानगरपालिका प्रशासन प्रक्रिया करते की नाही हे तपासून त्याबाबतचा अहवाल दर तीन महिन्यांनी महापालिकेकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मागवून घ्यावा असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने माहे जुलै, २०१९ मध्ये देवूनही उक्त आदेशाचे पालन करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वी सिटीझन सर्कल फॉर सोशल वेल्फेअर ॲण्ड एज्युकेशन या संस्थेच्यावतीने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिकेची दखल घेवून मुंबई उच्च न्यायालयाने महानगरपालिका प्रशासन तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाला सदर आदेश माहे जुलै, २०१९ मध्ये दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परदेशात सांडपाणी व कचरा समुद्रात सोडण्यापूर्वी त्याच्यावर शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली जाते परंतु, मुंबई महानगरपालिका प्रक्रिया न करताच कचरा व सांडपाणी समुद्रात सोडत असल्यामुळे या कचऱ्याचे विघटन न होताच लाटेव्दारे किनाऱ्यावर कचरा जमा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात जबाबदारी निश्चित करून विनाविलंब कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील सांडपाण्याची एकूण आठ सांडपाणी प्रक्रिया केंद्रातून खालीलप्रमाणे विल्हेवाट लावली जाते :-

लव्हग्रोव्ह व वांद्रे सांडपाणी सुविधा केंद्रामध्ये मलजलावर प्राथमिक प्रकारची प्रक्रिया करुन ३.५ कि.मी. लांब समुद्रात पातमुखाव्दारे सोडण्यात येते.

वर्सोवा, घाटकोपर व भांडुप मलजल प्रक्रिया केंद्र व वातीत तलाव या ठिकाणी मलजलावर व्दिस्तरीय प्रक्रिया करुन मलजल अनुक्रमे मालाड व ठाणे खाडीत सोडले जाते.

चारकोप व कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्र अलीकडेच अद्ययावत करण्यात आले असून, तेथे मलजलावर त्रिस्तरीय प्रक्रिया करुन मलजल सोडण्यात येत आहे.

मालाड येथील मलजल प्रक्रिया केंद्र येथे प्राथमिक प्रक्रिया केलेले मलजल मालाड खाडीत सोडले जाते.

सदर आठ मलजल प्रक्रिया केंद्रांपैकी सात जागी (मालाड मलजल केंद्र वगळून) महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने आखून दिलेल्या जुन्या मानकानुसार योग्य ती प्रक्रिया करुन प्रक्रिया केलेले सांडपाणी महानगरपालिकेमार्फत समुद्रात/खाडीत सोडले जाते व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मलजलाच्या नमुन्याची वेळोवेळी चाचणी केली जाते.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने दिनांक ११/०९/२०१९ रोजी दिलेल्या निर्देशानुसार सध्या अस्तित्वात असलेली सांडपाणी प्रक्रिया केंद्रे अद्ययावत करण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत योजिले असून, त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील मलनि:स्सारण सुधारण्याकरीता चार घटकांमध्ये कृती आराखडा तयार करण्यात आला असून, पहिल्या घटकानुसार अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर ९३.६८ कि.मी. लांबीच्या वाहिन्या टाकण्याचे उद्दिष्ट सन २०२३-२०२४ पर्यंत करण्याचे नियोजित असून, आजपर्यंत १५.०५ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले आहे. तसेच ५१.१५ कि.मी. लांबीचे मलनि:स्सारण वाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे.

दुसऱ्या घटकानुसार विकास नियोजनातील अविकसित अतिक्रमित रस्ते आणि झोपडपट्टी पुनर्विकास आराखड्यामधील रस्त्यांवर १४३ कि.मी. लांबीच्या मलजल वाहिन्या टाकण्याच्या कामांचा समावेश आहे.

तिसऱ्या घटकानुसार बिनपासाळी प्रवाहाच्या माध्यमातून नद्यांमध्ये विसर्ग होत असणाऱ्या मलजलास अटकाव करुन अस्तित्वात असलेल्या मलनि:स्सारण वाहिनीस वळविण्याकरीता किंवा नवीन मलनि:स्सारण वाहिनीचे जाळे निर्माण करुन सदर मलजल हा मलजल प्रक्रिया केंद्रापर्यंत

वाहून नेण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागारामार्फत कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

मिठी नदीत विसर्ग होणाऱ्या बिनपावसाळी प्रवाहास अटकाव करण्यासाठी खालीलप्रमाणे चार टप्प्यांमध्ये नियोजन करण्यात आले आहे :-

- पहिल्या टप्प्याच्या कामाचे कार्यादेश माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये देण्यात आले असून सदर काम प्रगतीपथावर आहे.
- दुसऱ्या टप्प्याच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.
- तिसऱ्या टप्प्यातील कामाच्या निविदा तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- चौथ्या टप्प्यातील कामाची निविदा मागविण्यात आली आहे.

तसेच दहिसर, पोईसर वालभट आणि ओशिवरा नद्यांच्या कामांची निविदा सुधारीत सांडपाणी विसर्ग मानकांच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत मागविण्यात आलेल्या आहेत.

चौथ्या घटकानुसार स्वच्छ भारत, स्वच्छ महाराष्ट्र, स्वच्छ मुंबई अभियानांतर्गत झोपडपट्टी किंवा इतर लहान रस्त्यावर घनकचरा विभागांतर्गत मलनि:स्सारण सुविधा पुरविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अरबी समुद्रातील प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) * ६६९४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक २९०२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरबी समुद्रातील प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या बांधकामासाठी तत्कालीन शासनाने तांत्रिक व प्रशासकीय मान्यता न घेता नियमभंग केल्याबाबत महालेखापालांनी सन २०१९-२०२० या दरम्यान आक्षेप घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अरबी समुद्रातील प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या बांधकामाच्या कामात नियमभंग झाल्याप्रकरणी तत्कालीन शासनाने राबविलेल्या निविदा प्रक्रियेबाबत आढावा घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आढाव्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
महालेखापालांनी सन २०१९-२०२० या दरम्यान आक्षेप घेतले आहेत.
(२) व (३) यासंदर्भात मंत्रालयस्तरावर आढावा बैठक घेण्यात आली आहे. महालेखाकारांना सादर झालेल्या अनुपालनावर अद्याप महालेखाकारांकडून त्यांचे उत्तर/भाष्य प्राप्त झालेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग व कोल्हापूर जिल्हयांना जोडणाऱ्या कुडाळ घाटाच्या कामाबाबत

**(२५) * ६७१० श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग व कोल्हापूर या दोन जिल्हयांना जोडणाऱ्या भैरीची पाणदा हा शीतकालिन घाट अंजनी (ता.कुडाळ) व पाटगांव (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) दरम्यान असून केवळ ४.५ कि.मी. अंतराच्या घाटाचे काम अपूर्णावस्थेत असून सार्वजनिक बांधकाम विभाग व वन विभागाचे सभूतिक सर्वेक्षण करुन केवळ ३२ कोटी रुपयांचा खर्च निर्धारित केलेला कुडाळ घाट पूर्ण झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घाट रस्त्याचे अपूर्णावस्थेत असलेले काम विनाविलंब पूर्ण करण्याकरीता परिसरातील ग्रामस्थांनी गत २ वर्षापासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व मा.पालकमंत्री आदिंकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावंतवाडी ते कोल्हापूर अंतर सध्या अस्तित्वात असलेल्या आंबोली, फेडा करुळ, भुईबावडा घाट मार्गापेक्षा ४५ कि.मी. अंतराने तसेच वेंगुर्ला ते कोल्हापूर अंतर ५५ कि.मी. ने कमी होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) प्रश्नांकित सिंधुदुर्ग-कोल्हापूर या जिल्हयांना जोडणाऱ्या घाट मार्गाचे प्राथमिक सर्व्हेक्षण करण्यात आले असून, त्यानुसार एकूण ५.११० कि.मी. घाट मार्गाचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

सदर घाट मार्गाच्या लांबीपैकी ४.११० कि.मी. लांबी वनक्षेत्राच्या हद्दीतून जाते. त्यापैकी ३.११० कि.मी. लांबी सिंधुदुर्ग जिल्ह्यात व १.०० कि.मी. लांबी कोल्हापूर हद्दीत येते.

सदर घाट रस्ता बांधकामासाठी अंदाजित खर्च रुपये ३२.३६ कोटी इतका असून, या घाट रस्त्याचे काम कोणत्याही योजनेतून मंजूर नसल्याने अद्याप पूर्ण झालेले नाही.

(२) याबाबत श्री.बाळा सावंत, अध्यक्ष टाळंबा धरणग्रस्त कृति समिती, मु. दुकानवाड यांचे दिनांक २८/०६/२०१६ चे निवेदनाव्दारे मागणी करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) व (५) प्रश्नाधीन सिंधुदुर्ग-कोल्हापूर या दोन जिल्हयांना जोडणाऱ्या घाट मार्गाबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत नेमलेल्या कंत्राटदाराने गैरव्यवहार केल्याबाबत

**(२६) * ६८८० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा व वाशिम जिल्ह्यामध्ये गत दोन वर्षात हॅम अंतर्गत डिपीआरचे काम गैरकायदेशीररित्या मोबालाईजेशन चार्जेस घेवून कंत्राटदारांनी आपले काम बंद केल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्याला जोडणाऱ्या शेगांव पालखी मार्गाच्या सुधारणा कामाकरीता सुधीर कंस्ट्रक्शन ईन्फ्रा स्पेस, शेगांव पालखी मार्ग प्रा. लिमिटेड या कंत्राटदाराला माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये मोबालाईजेशन चार्जेस पोटी रूपये १८.७५ कोटी देण्यात आले असूनही सदर कंपनीने आजपावेतो आपले कार्य पूर्ण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त ठिकाणी सदर कंत्राटदारांच्या मर्जीतून सार्वजनिक बांधकाम विभागाने डिपीआरसाठी एजन्सी नेमली अशी तक्रार करण्यात आली असल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) होय, खरे आहे.

सदर अर्ज दिनांक १८/९/२०२० रोजी प्राप्त झाला आहे. सदर अर्जावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांच्याकडून दिनांक ०६/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला आहे.

(२) होय.

कंत्राटदाराला करारनाम्यातील अटीच्या अधीन राहून मोबालाईजेशन ॲडव्हान्स देणेबाबत कार्यवाही दिनांक ०६/०२/२०१९ रोजी करण्यात आली होती.

संबंधित कंत्राटदारास कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अकोला यांचेकडून Appointed Date दिनांक ०५/०२/२०१९ रोजी देण्यात आली आहे. त्यानुसार कामाचा कालावधी २४ महिने म्हणजेच दिनांक ०४/०२/२०२१ पर्यंत होती. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने राज्यातील कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत सुरु असलेल्या कामांना ६ महिन्यांची मुदतवाढ दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर काम पूर्ण करण्याचा दिनांक ४/८/२०२१ असा आहे.

सद्य:स्थितीत या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. कंत्राटदार सदर काम विहीत गतीने करीत नसल्याने, करारनाम्यातील अट क्र.१२.३.१ नुसार प्रतिदिन रुपये १,८५,५००/- प्रमाणे एकूण रुपये १,८५,५०,०००/- इतकी दंडात्मक नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे.

(३) नाही, अशी कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत कामांबाबत विहित शासन नियमांचे तंतोतंत पालन करण्याचे आदेश असल्याने केंद्राप्रमाणेच खुल्या ऑनलाईन स्पर्धात्मक पध्दतीने ई-निविदा मागवून नियमानुसार तांत्रिक व आर्थिक क्षमताबाबतची अर्हता पूर्ण करीत असलेल्या निम्नत्तम कंत्राटदाराची डिपीआर कन्सल्टंन्ट म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर नेमणूक ही नियमानुसार करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे चितळसर, मानपाडा (ता.जि.ठाणे) येथील क्षेत्रावरील नोंद कमी केल्याबाबत

**(२७) * ७४४० श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर** : सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चितळसर, मानपाडा (ता.जि.ठाणे) येथील सर्व्हे क्रमांक ६१/१ व ६१/२ च्या क्षेत्रावरील नोंद कमी केल्याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ७ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पत्र लिहून कारवाईची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक ७ जानेवारी, २०२१ रोजी पत्र दिले आहे, ही बाब खरी आहे.

(२) केंद्र शासनाने मूळ नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ निरसित केल्यानंतर नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ राज्य शासनाने दिनांक २९/११/२००७ पासून स्वीकृत केला आहे. सदर निरसन अधिनियमानुसार विविध प्रयोजनासाठीचे कलम २० खालील सुटीचे आदेश (Exemption orders), त्याखालील कार्यवाही आणि नाजकधा कलम १०(३) व १०(५) अन्वये संपादित केलेल्या जमिनींवरील कार्यवाही संरक्षित आहे.

मौजे-चितळसर मानपाडा, ता.जि.ठाणे येथील स.क्र.६१/१ पै मधील ३५,१५६.१८ चौ.मी. क्षेत्रावर नाजकधा कलम २० अन्वये औद्योगिक प्रयोजनार्थ सुटीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. नाजकधा कलम २० अन्वये औद्योगिक प्रयोजनार्थ सुट देण्यात आलेल्या जमिनीच्या वापर बदलाच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २३/११/२००७ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. तद्नंतर व्दिसदस्यीय समितीने केलेल्या

शिफारशी विचारात घेऊन नाजकधा कलम २० अन्वये विविध प्रयोजनार्थ सुट देण्यात आलेल्या जमिनींबाबत शासन निर्णय दिनांक ०१/०८/२०१९ नुसार धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. सबब मौजे-चितळसर मानपाडा येथील स.क्र.६१/१ पै मधील औद्योगिक प्रयोजनार्थ सुट देण्यात आलेल्या क्षेत्राबाबत शासन निर्णय दिनांक ०१/०८/२०१९ नुसार कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

सबब, सदर प्रकरणी चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सविस्तर वस्तुस्थिती दर्शक अहवाल जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, ठाणे यांचेकडून शासन पत्र दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये मागविण्यात आला असून, सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंठा ते विजापूर (ता.शेलू, जि.परभणी) राष्ट्रीय महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(२८) * ७१५६ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा ते विजापूर (ता.शेलू, जि.परभणी) राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८-बी या रस्त्यावर देवगाव फाटा-सेलू, सेलू-पाथरी, पाथरी-सोनपेठ अशा मोठ्या गावांचा समावेश होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रस्त्याची दुर्दशा झाल्यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाल्याने अनेक तक्रारी झाल्यानंतर शासनाने उपरोक्त रस्त्याकरीता निधी मंजूर करून खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले असता सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम हे कंत्राटदार व संबंधित अभियंत्यांच्या मर्जीप्रमाणे सुरू असून लोकप्रतिनिधींनी याबाबत तक्रार करुनही कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अभियंता व कंत्राटदारांवर कारवाई करुन उक्त रस्त्याचे काम विनाविलंब पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ बी मधील अ) देवगाव फाटा ते सेलू मधील २०.०० कि.मी. पैकी १५.०० कि.मी. चे काम, ब) सेलू ते पाथरी मधील २२.५० कि.मी. पैकी १५.०० कि.मी. चे काम तसेच क) पाथरी ते सोनपेठ मधील १८.५० कि.मी. पैकी १५.५० कि.मी. चे काम ही कामे नियतकालीक दुरुस्तींतर्गत प्रगतीपथावर आहेत. सद्य:स्थितीत सदर रस्त्यांवरील डांबरीकरण व नुतनीकरणाचे प्रगतीपथावरील काम मानकानुसार गुणवत्तापूर्वक करुन घेण्यात येत आहे व उर्वरीत कामे लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेमार्फत हुतात्म्यांच्या वारसांना सदनिका मिळण्याबाबत

**(२९) * ७६०१ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुचविलेल्या सन २०३४ चा विकास आराखडा शासनाकडे फेरबदलांसह मंजुरीकरीता सादर केला असून त्यामध्ये स्वस्तदरातील घरांसाठी काही उपाय व धोरणे, काही भूखंड राखीव ठेवले आहेत मात्र, त्यात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील हुतात्म्यांच्या वारसांना सदनिका देण्याबाबत कोणत्याही धोरणाचा उल्लेख नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील गिरणी कामगार तसेच वारसांना सदनिका देण्याचे प्रस्तावित असून त्याच धर्तीवर संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हुतात्मा पत्करलेल्या १०७ हुतात्म्यांच्या वारसांना महापालिकेकडून बांधण्यात येणाऱ्या दहा लाख सदनिकांमधील एक सदनिका देण्यात यावी असा निर्णय महानगरपालिकेने घेतला असल्याचे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महापालिकेने घेतलेल्या सदर निर्णयास मान्यता मिळण्याकरीता सदर प्रस्ताव महापालिकेने माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महानगरपालिकेने पाठविलेल्या सदर प्रस्तावावर निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेने बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ दिनांक २७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द करुन त्यावर पुढील वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन सुधारणेसह कलम ३० अन्वये मंजूरीसाठी शासनास सादर केली. शासन नगर विकास विभागाने दिनांक ८/०५/२०१८ रोजीचे अधिसूचनेव्दारे प्रारुप विकास योजना-२०३४ सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला मंजूरी दिली असून दिनांक १/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे. सदर विकास योजनेत परवडणारी घरे (Affordable Housing) करीता आरक्षणे दर्शविण्यात आली आहेत. तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३३(८), ३३ (२०) मध्ये परवडणारी घरे (Affordable Housing) विकसित करण्यासंबंधी तरतुदी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. मात्र, कोणत्याही लढयातील अथवा स्वतंत्र संग्रामातील हुतात्म्यांच्या वारसांना सदनिका देण्याबाबत आरक्षण अथवा तरतूद विकास योजना तसेच विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) शासनाकडे अद्‌याप प्रस्ताव प्राप्त नसल्याने पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबेजोगाई नगर परिषदेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३०) * ८००७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबेजोगाई नगर परिषदेत ४७०० रुपयांची खुर्ची रुपये १९ हजार ९०० इतक्या रक्कमेने खरेदी करण्यात आली असून आद्‌यकवी मुकुंदराज सभागृह नुतनीकरणावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याची तक्रार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या जीएम पोर्टलवर एका खुर्चीची किंमत रुपये ४७००/- असून पुशबॅक खुर्ची खरेदीबाबत प्रचलित नियमाचे पालन न करता जवळच्या गुत्तेदाराला कंत्राट देवून अंबेजोगाई नगर परिषदेला विकास कामासाठी मिळालेला निधी खोटे कागदपत्र, अभिलेख, बनावट अंदाजपत्रक, बनावट दरपत्रक स्वत:च्या आर्थिक फायद्‌याकरीता तयार करुन गैरव्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, अपर जिल्हाधिकारी, अंबेजोगाई यांच्यामार्फत चौकशी सुरु असल्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी अहवाल सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई येथील गृहनिर्माण संस्थांना पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत

**(३१) * ८०४४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली, कामोठे, खारघर, नविन पनवेल, पूर्व-पश्चिम तळोजा येथील सिडको निर्मित गृहनिर्माण संस्थांना माहे ऑक्टोबर, २०१६ ते सन २०२१ पर्यंतचे मालमत्ता कर भरण्याचा ठराव पनवेल महानगरपालिकेकडून मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी बरेच गृह प्रकल्प सिडकोने विकसित केले असून सिडकोकडून सदर गृहनिर्माण संस्थांना पायाभूत सुविधा मिळाल्या नसून सदर गृह प्रकल्प सिडकोने पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गृह प्रकल्प सिडकोकडून पनवेल महानगरपालिकेकडे किती कालावधीत हस्तांतरीत करण्यात येणार आहे तसेच हस्तांतरीत करण्यात येणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना मालमत्ता करातून सुट देण्याबाबत पनवेल महानगरपालिकेकडून कोणती उपाययोजना करण्यात आली, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जमिनी व इमारतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम, ९९ अन्वये पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या दिनांक १७/०१/२०१९ च्या मान्यता प्राप्त दरानुसार मालमत्ता आकारणीचे काम सुरू आहे.

तसेच सदर कर आकारणी दिनांक ०१/१०/२०१६ पासून सुरू असल्याची बाब आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांनी कळविली आहे.

(२) व (३) पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बरेचसे गृहप्रकल्प सिडकोव्दारे विकसित करण्यात आले आहेत. सदरचे प्रकल्प पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले नसल्याची बाब पनवेल महानगरपालिका यांनी कळविली आहे.

तथापि, शासन अधिसूचना दिनांक १४/१०/२०१६ नुसार खारघर नोड व्यतिरिक्त इतर नोड पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले असल्याची वस्तुस्थिती सिडको यांनी कळविली आहे.

पुर्वाश्रमीच्या पनवेल नगर परिषद हद्द व २३ ग्रामपंचायती मधील क्षेत्रांना घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, दिवाबत्ती इत्यादी पायाभूत सुविधा हया पनवेल महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येतात.

तसेच सिडको विकसीत क्षेत्राला पाणीपुरवठा मलनि:स्सारण व्यवस्था, दिवाबत्ती या सुविधा सिडको प्रशासनामार्फत अद्यापपर्यंत दिल्या जात आहेत.

पनवेल महानगरपालिकामार्फत त्यांच्या अखत्यारीतील मालमत्तांना, विहित मुदतीत मालमत्ता कर अदा केल्यास ५% शासकीय कर वगळून सूट देण्यात आली आहे.

तसेच सौरऊर्जेचा वापर, जल पुनर्भरण, ऑनलाईन कर भरणा प्रणाली इ. वापर करणाऱ्या मालमत्ताधारकांना प्रोत्साहनात्मक सूट देखील देण्यात येत असल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्याबाबत

**(३२) * ८१३४ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय-निमशासकीय सेवेतील मागासवर्गीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्याचा निर्णय मा.उप मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीने घेतल्यामुळे गत तीन वर्षांपासून प्रलंबित सुमारे ४५ हजार मागासवर्गीयांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा होणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याबाबत व पदोन्नतीने रिक्त होणारी पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) व (२) पदोन्नतीमधील आरक्षणासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मा.उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या मंत्रीगटाच्या दिनांक १६/१२/२०२० च्या बैठकीतील निर्णयानुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्रमांक २७९७/२०१५ वरील दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ च्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून यापुढे पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दिनांक २५/०५/२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्याचा तसेच, दिनांक २५/०५/२००४ अथवा त्यानंतरची सेवा ज्येष्ठता विचारात घेऊन खुल्या प्रवर्गातील सेवाकनिष्ठ कर्मचारी पदोन्नत होत असल्यास सेवाज्येष्ठ मागासवर्गीय कर्मचाऱ्याला पदोन्नती देण्याचा निर्णय दिनांक १८ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महापालिकेच्या आरक्षित भूखंडावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(३३) * ८१७६ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महापालिकेकडे शाळा, खेळण्याची मैदाने, उद्याने, पोलीस ठाणे, कचराभूमी, पार्किंग, बस थांबे, मार्केट आणि इतर सोयी सुविधांकरीता आरक्षित ठेवण्यात आलेल्या ८७२ भूखंडावर लक्ष न दिल्याने उक्त भूखंडावर

अतिक्रमणे झाल्यामुळे शहरातील अनेक शासकीय विकास कामे प्रलंबित असल्याची बाब दिनांक १६ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहरात वाहनांची संख्या झपाटयाने वाढत असल्यामुळे शहरातील पार्किंगची समस्या निर्माण झाली असून अनेक भूमाफियांनी महापालिकेचे पार्किंग क्षेत्र बळकाविल्याने महापालिकेचे एकही शासकीय पार्किंग क्षेत्र उपलब्ध नसल्यामुळे शहरात अनधिकृत पार्किंगची समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वसई-विरार महापालिकेच्या विविध विकासकामासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील अतिक्रमणे निष्कासित करून नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वसई-विरार महापालिकेकडे शाळा, खेळण्याची मैदाने, उद्याने, पोलीस ठाणे, कचराभूमी, पार्किंग, बस थांबे, मार्केट आणि इतर सोयी सुविधांकरीता आरक्षित/राखीव ठेवण्यात आलेल्या ८७२ भूखंडांपैकी काही भूखंडांवर अनधिकृत बांधकाम झाले असल्याची वस्तुस्थिती वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तथापि, यापैकी बहुतांश अनधिकृत बांधकामे ही वसई-विरार क्षेत्रात ग्रामपंचायत/नगरपरिषद असल्यापासून व “सिडको” हे विशेष नियोजन प्राधिकरण असल्यापासून अस्तित्वात असल्याचे निदर्शनास येते. तसेच काही अनधिकृत बांधकामे वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर झाली असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात वाढत्या लोकसंख्येबरोबरच शहरात दुचाकी/चारचाकी वाहनांची संख्यादेखील झपाट्याने वाढत असून नोंदणीकृत वाहनांची संख्या सुमारे चार लक्षापेक्षा अधिक असल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

उपरोक्त बाब विचारात घेऊन महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना वाहने उभी करण्याची सोय सहजगतीने उपलब्ध करुन देण्याकरीता शहर वाहतूक पोलीस विभागाच्या समन्वयाने वसई-विरार शहर महानगरपालिकेने रेल्वे स्थानकाच्या लगत पुर्व-पश्चिम भागात १६ ठिकाणी पार्किंगक्षेत्र उपलब्ध करुन दिले आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने शहरात १६ गर्दीच्या ठिकाणी स्वयंचलीत सिग्नल यंत्रणा उभारली आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने वाहतूक कोंडी टाळण्याकरीता रस्त्यावर जुनी/बेवारस वाहने उचलणे/अनधिकृत पार्किंगमधील वाहने उचलण्यासाठी महानगरपालिकेकडून टोईंग वाहने देखील शहर वाहतूक पोलीस विभागास पुरविण्यात आली आहेत.

(३) वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेच्या विविध विकास कामासाठी आरक्षित भूखंडावरील अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे निष्कासित करुन सदर भूखंड संरक्षित करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४८३ नुसार व शासन परिपत्रक दिनांक ०४/०३/१९९६ अन्वये पोलीस बंदोबस्त मागून निष्कासनाची मोहिम वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत पार पाडण्यात येते.

सद्य:स्थितीत वसई-विरार शहर महानगरपालिकेने १२९ आरक्षित भूखंडावरील अतिक्रमणे निष्कासित करुन, सदरचे भूखंड संरक्षित केल्याची बाब वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

तसेच आतापर्यंत १११६६ इतकी अतिक्रमणे निष्कासित करुन त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलमान्वये ४८५ गुन्हे व ११८ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत खेळांची १४ मैदाने, ४५ तलावांचे सुशोभिकरण, ८५ स्मशानभूमी इत्यादी आरक्षित भूखंडावरील विकास कामे करण्यात आली असून विरार (प.) येथे क्रीडा संकुल विकासनाची काम सुरु आहे.

तसेच महानगरपालिका क्षेत्रात जलतरण, मार्केट, समाज मंदीरे, उद्याने यांचा विकास करण्यात आला असून टप्प्या टप्प्याने पूर्णत: हस्तांतरीत झालेल्या आरक्षित जागा विकसित करण्याची कार्यवाही वसई-विरार शहर महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत

**(३४) * ७०२५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या शाळेतील इयत्ता १० वी मध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी अर्थ सहाय्य करण्याच्या प्रस्तावास महानगरपालिकेकडून नकार दर्शविण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेचे २६ हजार कोटी रुपयांचे अर्थसंकल्पीय तरतूद असून महानगरपालिकेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरची परिस्थिती प्रतिकुल असल्याने इयत्ता १० वीत ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी रुपये २५ हजारांची आर्थिक मदत देण्याबाबतच्या ठरावाची सूचना सन २००४ मध्ये संमत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत ९५ टक्के मिळालेल्या विद्यार्थ्यांना रूपये १० हजारांची मदत केली जात असून इयत्ता १० वी तील गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व महानगरपालिका शाळांमधून ८०% किंवा त्याहून अधिक गुण मिळवून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास महानगरपालिका निधीतून रुपये २५ हजार इतके अर्थसहाय्य देण्याबाबत ठरावाची सूचना सन २००४ मध्ये मांडण्यात आली होती.

तथापि, नकारात्मक अभिप्रायासह सदर ठरावाची सूचना माहे डिसेंबर, २०२० मध्ये दप्तरी दाखल करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजीच्या ठरावान्वये, माध्यमिक शालांत परीक्षेत ९०% ते ९४.९९% पर्यंत गुण प्राप्त करणाऱ्या महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी रोख रक्कम रुपये ५०००/- व ९५% वा त्याहून अधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रति विद्यार्थी रोख रक्कम रुपये १०,०००/- देण्यात येते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३५) * ६७७५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिका हद्दीतील संघर्ष नगर ते भांडेवाडी रेल्वे स्टेशन व चांदमारी मंदिर ते डम्पिंग यार्ड पर्यंतच्या रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांवरुन वाहने चालवताना प्रवाशांना मोठ-मोठ्या खड्डयांचा सामना करावा लागत असून अपघाताचे प्रमाण वाढून नागरिकांच्या तब्येतीवर देखील त्यांचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नागपूर शहर महानगरपालिका हद्दीतील संघर्ष नगर चौक ते भांडेवाडी रेल्वे स्टेशन या रस्त्यापैकी, "संघर्ष नगर चौक ते भांडेवाडी रेल्वे डम्पिंग यार्ड" या १४५० मीटर लांब आणि २४ मीटर रुंद रस्त्याच्या डांबरीकरणासंदर्भात दिनांक ०८/०१/२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून, प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली आहे. सदरचे काम जानेवारी, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

तसेच चांदमारी मंदिर ते डम्पिंग यार्ड या रस्त्यापैकी, "गिड्डोबा मंदिर ते बिडगांव रोड (चांदमारी रोड)" या १२५० मीटर लांब आणि १२ मीटर रुंद रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास दिनांक ०६/०१/२०२१ पासून, महापालिकेच्यावतीने सुरुवात करण्यात आलेली आहे. सदरचे काम जून, २०२१ पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जमातीसाठी आरक्षित जागांवर बोगस उमेदवारांनी नोकऱ्या मिळविल्याबाबत

**(३६) * ७१९४ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत अनुसूचित जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागांवर जातीची बनावट प्रमाणपत्रे सादर करुन मोठ्या प्रमाणावर बिगर आदिवासींनी नोकऱ्या मिळविल्याच्या प्राप्त झालेल्या तक्रारींवर दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी एका प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जमातीच्या आरक्षित नोकऱ्या मिळविणाऱ्या बिगर आदिवासींना शासकीय सेवेत संरक्षण देता येणार नसल्यामुळे शासनाने त्याबाबत कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी असल्याचे खोटे जातीचे दाखले देऊन अनुसूचित जमातीच्या आरक्षित नोकऱ्या मिळविणाऱ्या १२ हजारांपेक्षा अधिक बिगर आदिवासी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध विभागात अधिसंख्य पदे निर्माण करुन ११ महिन्यांच्या कालावधीसाठी फेरनियुक्त्या देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, मात्र बिगर आदिवासी अधिकारी-कर्मचाऱ्यांना फेरनियुक्त्या देण्याची प्रक्रिया अजून सुरुच असून १२ हजार जागा रिक्त होऊनही गत दोन वर्षात फक्त २८ आदिवासी उमेदवारांच्याच नियुक्त्या करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णय, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ अन्वये उपरोक्त कर्मचाऱ्यांचा ११ महिन्यांचा अधिसंख्य पदाचा कालावधी संपल्यानंतरही त्यांना शासन सेवेतून कमी केले नसल्यामुळे अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी खऱ्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती/पदोन्नती देण्याबाबत लोकप्रतिनिधी व बिरसा क्रांती दलाने मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेतून कमी करुन खऱ्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती/पदोन्नती देण्याबाबत कोणती विशेष कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेतून कमी न करण्याची कारणे काय आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दिनांक ६/०७/२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिलेला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विभागाच्या दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत नियुक्त केलेल्या व सदर जातींचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचे निदेश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार विभागास आतापर्यंत प्राप्त झालेल्या माहितीनुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या ३०४३ अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेले असून अनुसूचित जमातीच्या ६१ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. कोविड-१९ या महामारीमुळे राज्यात मार्च, २०२० पासून लॉकडाऊन करण्यात आल्याने सन २०२० मध्ये भरती प्रक्रिया पूर्ण क्षमतेने राबविणे शक्य झाले नाही.

(३) व (४) होय, हे खरे आहे

या विभागाच्या दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक ३१/१२/२०१९ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी अधिसंख्य पदावर वर्ग करुन सदर रिक्त झालेली पदे दिनांक १/०२/२०२० पर्यंत कालबध्द कार्यक्रमानुसार भरण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

दिनांक १५/०६/२०२० च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत चालू ठेवाव्यात किंवा कसे, तसेच त्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवा विषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभांबाबत अभ्यास करुन शासनास शिफारशी

करण्यासाठी मा.मंत्री, अन्न व नागरी पुरवठा यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यास गटाने आपल्या शिफारशी शासनास अद्याप सादर न केल्यामुळे अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना दिनांक २७/११/२०२० च्या शासन निर्णयान्वये ११ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियान राबविण्याबाबत

**(३७) * ७७४० श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने सन २०१५ मध्ये देशातील विविध शहरांमध्ये स्मार्ट सिटी अभियान राबविण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार उक्त अभियानांतर्गत राज्यातील १० शहरांचा समावेश करण्यात आलेला असून सदर योजनेत आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत अनेक सोयी सुविधा उपलब्ध करण्याचे ठरविण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शहरामार्फत तयार केलेले रुपये २९,६४७ कोटी किंमतीचे स्मार्ट सिटी प्रस्ताव केंद्र शासनास विहित मुदतीत सादर करण्यात आले असून स्मार्ट शहरासाठी ५ वर्षासाठी प्रतिवर्ष/प्रतिशहर केंद्र शासनाने रुपये १०० कोटी तर राज्य शासनाचे प्रतिवर्ष/प्रतिशहर रूपये ५० कोटी इतके अनुदान उपलब्ध करण्याचे ठरविण्यात आलेले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून प्रत्यक्षात सदर योजनेसाठी किती निधी, केव्हा उपलब्ध करण्यात आला आहे व उर्वरित निधी उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर योजनेसाठी असलेला पाच वर्षांचा कालावधी संपत आल्यानंतरही त्याची अंमलबजावणी झाली नसल्यामुळे कामे अपूर्णावस्थेत असल्याप्रकरणी शासनाने आढावा घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानांतर्गत स्पर्धात्मक पध्दतीने राज्यातील पुणे, सोलापूर, कल्याण-डोंबिवली, नाशिक, नागपूर, ठाणे, औरंगाबाद आणि पिंपरी-चिंचवड या ८ शहरांची निवड झाली आहे व या शहरांमध्ये स्मार्ट सिटी अभियान राबविण्यात येत आहे.

(२) व (३) सदर योजना राबविण्याकरीता निवड झालेल्या स्मार्ट शहरांसाठी ५ वर्षासाठी प्रतिवर्ष/प्रतिशहर केंद्र शासनाचे रुपये १०० कोटी तर राज्य शासनाचे रुपये ५० कोटी इतके अनुदान उपलब्ध करण्याचे ठरविण्यात आलेले आहे.

त्यानुसार स्मार्ट सिटी योजनेत निवड झालेल्या शहरांना आतापर्यंत केंद्र व राज्य शासनाचा असा मिळून रुपये २९७१ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

स्मार्ट सिटी अभियानांतर्गत प्रस्तावित प्रकल्पांच्या प्रगतीनुसार व यापूर्वी उपलब्ध करून दिलेल्या निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनाकडे सादर केल्यानंतर केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर केंद्र हिस्सा व समरूप राज्य हिस्सा असा मिळून पुढील हप्त्याचा निधी संबंधित शहरास वितरित होईल.

(४) व (५) स्मार्ट सिटी अंतर्गत कामांसाठी विशेष उद्देश वहनांची (एस.पी.व्ही.) स्थापना करण्यात आलेली असून स्मार्ट सिटी अभियानांतर्गत प्रकल्प पूर्णत्वास नेण्याबाबतचे सर्व प्रशासकीय व वित्तीय अधिकार विशेष उद्देश वहनास प्रदान करण्यात आलेले आहेत.

स्मार्ट सिटी अभियानांतर्गत ८ शहरांमध्ये रुपये २८४३ कोटी किंमतीचे १०६ प्रकल्प पूर्ण झाले असून उर्वरित प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच, राबविण्यात येणाऱ्या विविध कामांदरम्यान आवश्यक तेथे जागांचा ताबा घेणे, स्थानिक नागरिकांचे प्रश्न सोडविणे, रस्ते विकास कामे करताना विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधणे, पावसाळ्यातील रस्ते खोदाईच्या कामास असणारे निर्बंध तसेच कोविड-१९ महामारीच्या परिस्थितीमुळे प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यास जास्तीचा कालावधी लागत असून सद्य:स्थितीस कामांच्या आर्थिक तसेच भौतिक प्रगतीमध्ये टप्प्याटप्प्याने सुधारणा होत आहे.

-----------------

## नागपूर महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(३८) * ७२३७ श्री.प्रवीण दटके : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ५७९६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सूचनांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास परिपत्रक क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.२७/१६-ब(सी) निर्गमित केले असून यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या वंचित वारसदारांना सेवेत घेताना अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारसाहक्क नामनिर्देशन, पदोन्नती झालेली असल्यास त्याप्रमाणे वारसदारांना हक्क मिळणे तसेच वयाची अट शिथिल करणे इत्यादी आवश्यक सुधारणा करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सफाई कामगारांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांना लाभ मिळताना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करणे आवश्यक असल्याने या परिपत्रकात सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा शहरातील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(३९) * ६९२९ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा शहरात मागील दोन वर्षापासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत भूमिगत गटार योजना, अमृत वाढीव पाणीपुरवठा योजनेकरीता रुपये १०२ कोटी निधीची कामे करताना सिमेंटचे रस्ते फोडण्यात आल्याने संबंधित कंत्राटदारांकडून दुरुस्ती करतांना निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे दिनांक ०३ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत वर्धा शहर पाणीपुरवठा आणि मलनि:स्सारण प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून दोन्ही प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाव्दारे काम पाहिले जाते.

सदर अमृत योजनेतील मलनि:स्सारण प्रकल्पातील मलनि:स्सारण वाहिनी टाकण्याच्या कामातील खोदण्यात आलेल्या रस्त्यांपैकी सद्य:स्थितीस ३८ कि.मी. लांबीचे रस्ते पुनर्प्रस्थापित करण्याचे काम पूर्ण झाले आहे.

दिनांक ०३ जानेवारी, २०२१ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व नगर परिषद, वर्धा यांचेमार्फत संयुक्त पाहणी केली असता पुनर्प्रस्थापिकरण करण्यात आलेल्या रस्त्यांपैकी ३ ते ४ कि.मी. रस्त्यांचे पृष्ठभाग उखडत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) सदर विषयी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी अधीक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून समितीस पाहणी दरम्यान काही ठिकाणी रस्त्यांचा पृष्ठभाग खराब झाल्याचे निदर्शनास आले.

सदर खराब झालेले रस्ते स्वखर्चाने दुरुस्त करण्याचे आदेश संबंधित ठेकेदारास देण्यात आले आहेत. त्यानुसार, कंत्राटदारामार्फत रस्त्यांच्या पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर आहे.

कंत्राटदार यांनी केलेल्या गुणवत्ताहीन कामाबद्दल कंत्राटदाराच्या देयकातून खराब झालेल्या रस्त्यांच्या किंमतीऐवढी रक्कम कपात करुन ठेवण्यात आलेली आहे. तसेच, कंत्राटदाराचे धावते देयक प्रलंबित ठेवण्यात आलेले आहे.

-----------------

## ऐरोली (नवी मुंबई) येथे अभ्यासिका व व्यायाम शाळा सुरू करण्याबाबत

**(४०) * ६८३७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील ऐरोली, सेक्टर १७ मधील एका उद्यानात महापालिकेमार्फत लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेल्या अभ्यासिका आणि व्यायामशाळेची इमारत चार वर्षाचा कालावधी होऊनही उद्घाटन न झाल्यामुळे विनावापर पडून असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिकदृष्टया गरीब परंतु वाचनाची आवड असणारे विद्यार्थ्यांना हक्काची अभ्यासिका आणि व्यायाम शाळा सुविधेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अभ्यासिका आणि व्यायाम शाळा सुरु करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ऐरोली, सेक्टर-१७ मधील भूखंड क्र. ५बी उद्यानाजवळ जुन्या ग्रामपंचायतकालीन व्यायाम शाळेची बहुउद्देशीय इमारत विकसित करून मालमत्ता विभागास दिनांक २६/०९/२०१९ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

सदर इमारतीचा वापर व्यायाम शाळेकरीता करण्यासाठी दिनांक ११/०७/२०१९ रोजी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती, परंतु स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्याने निविदा प्रक्रिया पुन्हा राबविण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

कोविड-१९ काळात सर्व सामाजिक इमारतींचा वापर बंद असल्याने कार्यादेश देण्यास विलंब झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर इमारतीच्या परिसरात ऐरोली सेक्टर-१, २, ३ व ४ याठिकाणी ग्रंथालय/अभ्यासिका कार्यरत असून, सेक्टर-५ येथे नव्याने अभ्यासिका सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच ऐरोली सेक्टर-२ येथे व्यायाम शाळा कार्यरत आहे.

सबब, आर्थिकदृष्ट्या गरीब परंतु वाचनाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना हक्काची अभ्यासिका आणि व्यायाम शाळेच्या सुविधेपासून वंचित रहावे लागत आहे, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(३) नवी मुबई महानगरपालिका क्षेत्रातील ऐरोली, सेक्टर-१७ येथील ग्रामपंचायतकालीन व्यायाम शाळा विकसित करण्यात आलेली असून, याबाबत लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण करून अध्यक्ष/सचिव हेल्पींग लाईफ चॅरीटेबल ट्रस्ट यांना सदर व्यायाम शाळा वितरित करण्यात येणार असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीवर्धन (जि.रायगड) व मंडणगड (जि.रत्नागिरी) दरम्यान सागरी सेतू बांधण्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४१) * ६३८५ श्री.प्रसाद लाड, श्री.महादेव जानकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) मधील बागमांडला आणि मंडणगड (जि.रत्नागिरी) येथील बाणकोट या दरम्यान खाडीवर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सागरी महामार्गावरील महत्वाकांक्षी सागरी सेतू बांधण्याचे काम सन २०१३ मध्ये तत्कालीन शासनाच्या काळात सुरू होवून तब्बल सात वर्षे उलटले तरीही सदर पुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३ मध्ये सुरू करण्यात आलेल्या सागरी सेतू प्रकल्पाचा अंदाजित खर्च रुपये २०० कोटी इतका असून सन २०१५ अखेरपर्यंत सदरहू पुलाचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक सुलभ होणार असून रायगड व रत्नागिरी या कोकणातील जिल्ह्यासह गोव्याला जाण्याकरीता अंतर खूपच कमी होणार असल्यामुळे त्या परिसरातील स्थानिक क्षेत्रात पर्यटनाला मोठ्या प्रमाणावर वाव असल्याने रोजगारातही वाढ होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सागरी पुलाच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे व आतापर्यंत पूर्ण झालेल्या कामावर प्रत्यक्षात किती रक्कम खर्च करण्यात आला आहे तसेच सदर सागरी सेतूचे काम अपूर्णावस्थेत असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त सागरी सेतूचे प्रलंबित काम शीघ्रगतीने हाती घेऊन वाहतूकीसाठी कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) श्रीवर्धन, जि.रायगड-बाणकोट खाडीवरील सागरी सेतू बांधण्याच्या कामास अद्यापपर्यंत एकूण रुपये १२७.५३ कोटी इतका खर्च झाला आहे. ठेकेदाराच्या आर्थिक अडचणींमुळे सदर काम संथगतीने चालू होते.

सदर पुलाचे बांधकाम दिनांक १३/०४/२०१८ पासून पूर्णत: बंद असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम पुन:श्च सुरु करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा विभागातील सहायक अभियंता व कनिष्ठ अभियंता पदाच्या सेवा प्रवेशाबाबत

**(४२) * ६३६१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा विभागात सहायक अभियंता श्रेणी-२ व कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब अराजपत्रित या पदाची भरती महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ५ मार्च, १९९८ भाग चार-अ नुसार सेवा प्रवेशाचे विनियमन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहायक अभियंता श्रेणी-२ व कनिष्ठ अभियंता पदाकरीता पदविका किंवा पदविकासह पदवीधारक उमेदवार सेवेसाठी पात्र असल्याचे सदर राजपत्रातील अ.क्र. ३-अ मध्ये नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत १२ वी नंतर अभियांत्रिकी शिक्षण घेण्याऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने अभियांत्रिकी सेवारचनेच्या पुनर्रचने संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या श्री.के.पी.बक्षी समितीने अभियांत्रिकी पदवीधरांचे व पदविकाधारकाचे सहायक अभियंता श्रेणी-२ व कनिष्ठ अभियंता या पदावर भरतीचे प्रमाण ५०:५० असावे असा अहवाल शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने श्री.के.पी.बक्षी समितीच्या अहवालानुसार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

सहायक अभियंता (स्थापत्य) श्रेणी-२ सेवाप्रवेश नियम, १९९७ महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १६/०६/१९९७ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. त्यात शासन अधिसूचना दिनांक ८/७/२००९ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट (ब) अराजपत्रित पदाचे सेवाप्रवेश नियम, १९९८ महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ०५/०३/१९९८ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमामध्ये अधिसूचना दिनांक ९/११/१९९८ व दिनांक २९/०३/२००६ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

सहायक अभियंता श्रेणी-२ गट (ब) राजपत्रित या पदाच्या सेवाप्रवेश नियम, १९९७ मधील नियम ३ (२) नुसार त्या पदासाठी स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवीधारक उमेदवार पात्र आहे.

कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट-ब अराजपत्रित पदाचे सेवाप्रवेश नियम, १९९८ मधील नियम ३-ब (२) नुसार या पदासाठी शासन मान्यता प्राप्त ३ वर्ष कालावधीची स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली इतर कोणतीही अर्हता धारण केलेले उमेदवार पात्र आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) श्री.के.पी.बक्षी समितीच्या शिफारशी शासनाने अद्‌याप स्वीकारलेल्या नसल्याने सदर अहवालातील शिफारशीनुसार भरती प्रक्रिया राबविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मोरिवली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील कचराभूमी निष्कासित करण्याबाबत

**(४३) * ७९२९ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मोरिवली, अंबरनाथ नगरपरिषद (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) हद्दीतील अनधिकृत कचराभूमी निष्कासित करण्यासाठी नागरिकांच्या संयुक्त संघर्ष समितीने आंदोलन करण्याचा इशारा तसेच कचराभूमी न हटविल्यास आक्रोश मोर्चाही काढण्याचा इशारा माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनास दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोरिवली (अंबरनाथ) भागात महामार्गाशेजारी असलेल्या मोकळ्या जागेत अंबरनाथ नगरपरिषदेने बेकायदेशीरपणे कचरा टाकण्यास सुरुवात केल्याने संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरुन रोगराई पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कचराभूमी निष्कासित करण्यासाठी विविध शासकीय संस्थांनी नगरपरिषदेला लेखी कळवूनही नगरपरिषदेने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर अनधिकृत कचराभूमी निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे निवेदन नगरपरिषदेस प्राप्त झाले, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

गट नं. ७३, मौजे मोरिवली येथील अंबरनाथ नगरपरिषदेच्या जागेवर सुमारे ६० वर्षापासून नगरपरिषद हद्दीतील जमा होणाऱ्या कचऱ्याची तात्पुरत्या स्वरुपात विल्हेवाट लावली जात आहे, ही वस्तुस्थिती आहे.

सर्व्हे क्र. १३२, मौजे चिखलोली या नगरपरिषदेच्या जागेवर घनकचरा व्यवस्थापनासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर करण्यात आलेला होता. तसेच, सध्याच्या कचराभूमीच्या ठिकाणी असलेल्या कचऱ्यावर प्रक्रियादेखील सुरु करण्यात आलेली होती.

तथापि, सर्व्हे क्र.१३२, मौजे चिखलोली या ठिकाणी घनकचरा प्रकल्प उभारण्यास नागरिकांचा विरोध झाल्याने सर्व्हे क्र. १८८, मौजे वालिवली या नागरी वस्तीबाहेर असलेल्या ठिकाणी कायमस्वरुपी कचराभूमी उभारण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करण्यात आला असून सदर प्रकल्पासाठी आवश्यक त्या मान्यता घेण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत सुरु आहे.

मान्यतेनंतर सदर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार असून प्रकल्प कार्यान्वित होताच सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेली कचराभूमी निष्कासित करण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाशी ते मानखुर्द या प्रस्तावित सागरी पुलामुळे बाधित होणाऱ्या मच्छीमार बांधवांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४४) * ७१०१ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडी दरम्यान वाशी ते मानखुर्द या मार्गावर नव्याने सागरी पूल बांधण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलामुळे नवी मुंबई येथील १४७० मच्छीमार कुटुंब विस्थापित होत असून राष्ट्रीय हरित लवासाच्या मार्गदर्शक प्रणालीप्रमाणे प्रकल्पबाधित मच्छीमार कुटुंबियांना शासन आर्थिक मदत करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशाने मुंबई महानगर विकास प्राधिकरण, महसूल व मत्स्यव्यवसाय खात्याचे अधिकारी यांनी संयुक्त पाहणी व तपासणी करून बाधित मच्छीमार कुटुंबाची संख्या निश्चित केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड येथील व्हीआयपी रस्ता ते गोकुळनगर स्थानक रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४५) * ६७२५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील व्हीआयपी रस्ता ते गोकुळनगर स्थानक या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून अनेक ठिकाणी रस्त्यापेक्षा चेंबर्स उंच असल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नांदेड येथील व्हीआयपी रस्ता ते गोकुळनगर स्थानक या रस्त्याच्या ज्या भागात मलनि:स्सारण वाहिनीचे चेंबर आहे त्या भागातील रस्ता खचल्यामुळे चेंबर रस्त्यापेक्षा उंच झाले होते, ही वस्तुस्थिती आहे.

मात्र, सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती करण्यात येवून सद्य:स्थितीत रस्ता व चेंबर समपातळीवर आहे.

आवश्यकतेनुसार रस्त्यांची दुरुस्ती महानगरपालिकेकडून वेळोवेळी करण्यात आलेली आहे. तसेच सदर रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढलेले नसल्याचा अहवाल आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# बुलढाणा ते धाड रस्त्याच्या व कोलवड येथील पुलाच्या बांधकामात अनियमितता झाल्याबाबत

**(४६) * ६५७७३ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा ते धाड या रस्त्याच्या कामामध्ये दोन ते अडीच फूट खोदलेल्या रस्त्यामध्ये लाल माती व मुरूमाचा भराव करणे आवश्यक असताना संबंधित ठेकेदाराने काळी माती व कच्चा मुरूम टाकून रस्त्याचा भराव केला असून ८० एमएम गिट्टी टाकून त्यावर कच्चा मुरूम व पाणी टाकून दबाई करणे आवश्यक असताना ठेकेदाराने ४० एमएम गिट्टी कमी वापरून त्यामध्ये काळी माती वापरून निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिमेंट सिलकोट हा एक फूट जाडीचा करुन त्यामध्ये २० एमएम लोखंड वापरणे आवश्यक असताना, संबंधित ठेकेदाराने ८ एमएम लोखंड वापरून सिमेंट थरामध्ये निकृष्ट दर्जाचे (Expired Cement) वापरलेले असणे तसेच तिसरा डांबर कोटचा थर करतेवेळी डांबर प्लांट हा ६० कि.मी. अंतराच्या आत असावा व तेथून डांबर टिप्परव्दारे आणून त्याचे तापमान तपासून ते रस्त्यावर टाकण्याचा नियम असताना ठेकेदाराचा डांबर प्लांट हा साखरखेर्डा येथे ६५ कि.मी. अंतरावर असल्याचे देखील माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे थंड मिक्सिंग डांबर रस्त्यावर अंथरल्यामुळे रस्त्याची पातळी खालीवर झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले होते तसेच कोलवड येथील पैनगंगा नदीवर बांधण्यात येणाऱ्या पुलामध्ये देखील गंजलेले लोखंड, कच्च्या विटा, माती मिसळलेली रेती, मुदत संपलेले सिमेंट इत्यादी साहित्याचा वापर करून पुलाचे निकृष्ट दर्जाचे काम संबंधित ठेकेदाराने कार्यकारी अभियंता, सा.बा. विभाग, बुलढाणा यांच्या संगनमताने केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामामध्ये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा यांनी शासकीय ठेकेदार पलसिध्द कंस्ट्रक्शन यांना जास्तीचे काम मिळवून दिले असून उक्त निकृष्ट दर्जाच्या कामासंदर्भात जिल्हाधिकारी, बुलढाणा त्यांच्याकडे दिनांक २३ जुलै, २०२० रोजी लेखी तक्रार देऊनही तसेच या बुलढाणा ते धाड २७ कि.मी. (हायब्रीड प्लॅन) रस्त्याच्या कामाच्या अनेक तक्रारी झालेल्या असतानाही शासनाने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर दोषी कार्यकारी अभियंत्याची बदली होऊनही गत २ वर्षा पासून ते मुदत वाढ घेऊन उक्त ठिकाणी कार्यरत असल्यामुळे उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

सदरचे काम हे मानकांप्रमाणे व निविदा शर्तीप्रमाणे करण्यात येत आहे.

तसेच उद्योजकाचा हॉट मिक्स प्लांट साखरखेर्डा येथे नसून पांगरी उबरहांडे येथे कामाच्या ठिकाणापासून १५.७० कि.मी. अंतरावर आहे.

(३) हे खरे नाही.

प्रत्येक टिप्परमधील डांबर मिश्रीत खडीचे कामावर पोहचल्यानंतरच तापमान नोंदवले जाते व तापमान योग्य असल्याची खात्री झाल्यानंतरच ते पसरविलेले आहे. त्यामुळे रस्त्याची पातळी कुठेही खालीवर झालेली नाही.

कोलवड येथील अस्तित्वात असलेल्या कमी उंचीच्या पुलाऐवजी तेथे पूर्वीच्या पुलापेक्षा जास्त उंचीचा ३९ मिटर लांबीचा पुल बांधण्यात आलेला आहे. या पुलाच्या कॉंक्रिटीकरणासाठी (Fresh) ताजे सिमेंट वापरण्यात आले आहे.

तसेच या कामावर देखरेख करण्यासाठी व गुणवत्ता तपासणीसाठी स्वतंत्र अभियंता यांची नियुक्ती करण्यात आली असून, या कामासाठी वापरण्यात येणारे सर्व बांधकाम साहित्य हे प्रयोगशाळेमध्ये गुणवत्ता चाचणी करुन योग्य दर्जाची खात्री झाल्यानंतरच वापरण्यात येते.

(४) हे खरे नाही.

(५) या ठिकाणी पूर्वी कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता यांची बदली सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव येथे झाली असून ते दिनांक १०/०८/२०२० रोजी तेथे रुजु झाले आहेत. सद्य:स्थितीत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा हे पद रिक्त असल्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात त्यांच्याकडे कार्यभार देण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील स्कायवॉकची दुरवस्था झाल्याबाबत

**(४७) * ६६९८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पादचाऱ्यांकरीता रेल्वे आणि एमएमआरडीएमार्फत बांधण्यात आलेल्या स्कायवॉकवर गर्दुल्ल्यांचा व भिकाऱ्यांचा वावर वाढल्यामुळे स्कायवॉकचा वापर करणाऱ्या नागरिकांच्या विशेषत: महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील अनेक स्कायवॉकची दुरवस्था झाली असून काही स्कायवॉकमध्ये दुर्घटना होऊन पदचाऱ्यांना तसेच वाहतुकीकरीता अडचणीचे बनत असल्याने उक्त स्कायवॉक काढून टाकण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरवापर व दुरवस्था झालेल्या स्कायवॉकबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) स्कायवॉकवरील गर्दुल्ले व भिकाऱ्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थानिक पोलिसांच्या मदतीने नियमितपणे कारवाई करण्यात येते.

(२), (३) व (४) मुंबई शहर व उपनगरातील स्कायवॉकची दुरुस्ती करण्यासाठी व्ही.जे.टी.आय. या संस्थेची नेमणूक करण्यात आली होती.

सदर संस्थेने दिलेल्या अहवालानुसार स्कायवॉकच्या दुरुस्तीची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहेत.

-----------------

## पुण्यातील पिंपळे गुरव व सांगवी परिसरात कुत्र्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत

**(४८) * ६६८० श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील पिंपळे गुरव व सांगवी परिसरात १२ भटक्या कुत्र्यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात प्राणिप्रेमींनी स्थानिक पोलीस स्थानकात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, कुत्र्यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) पिंपळे गुरव व सांगवी परिसरात श्री.विनोद राजन मुरार यांचा ५ वर्षाचा इंडियन परिहा नर जातीच्या कुत्र्याचा विषारी अन्न पदार्थ खाल्यामुळे मृत्यू झाला असून, पिंपळे गुरव पुणे येथील पवना नदीच्याकडेला अंदाजे १ वर्षाच्या कुत्र्यास अर्धवट जाळून मारले असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. तथापि, याबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे कोणत्याही स्वरूपाची लेखी निवेदन/तक्रार प्राप्त झालेली नाही.

या संशयास्पद मृत्यूबाबत श्री.विनोद राजन मुरार यांनी एफ.आय.आर. क्र. ३/२०२१ अन्वये अज्ञात इसमाविरूध्द सांगवी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

यातील अज्ञात आरोपीचा शोध सुरू असून, घटनास्थळी सी.सी.टी.व्ही. ची पाहणी केली असता घटनेचे कोणतेही फुटेज उपलब्ध झालेले नाही. तसेच पोस्ट मार्टमकरीता राखून ठेवलेले नमूने तपासण्याची कार्यवाही सुरू असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड, पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बेलखेड, अडसूळ, मालेगांव बाजार (ता.तेल्हारा, जि.अकोला) या गावांच्या मुख्य रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४९) * ६८८३ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलखेड, अडसूळ, मालेगांव बाजार (ता.तेल्हारा, जि.अकोला) या तिन्ही गावांच्या मुख्य रस्त्याचे नुतनीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कंत्राटदाराचे आर्थिक हित जपण्यासाठी घोडगांव या रस्त्याचे खोदकामास परवानगी दिल्यामुळे उपरोक्त गावांच्या नागरिकांना रहदारी करणे कठिण झाले असून उक्त रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्यामुळे पूर्ण करण्याबाबतची तक्रार ग्रामस्थांनी, संबंधित विभाग व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याचे काम अपुर्णावस्थेत असल्यामुळे डॉ.सौ.संजीवनी बिहाडे यांनी दिनांक १२/०८/२०२० रोजी शासनाकडे निवेदन दिले आहे.

(२) बेलखेड, अडसूळ, माळेगांव बाजार ता.तेल्हारा या तिन्ही गावांच्या मुख्य रस्त्याचे काम सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहे. सदर काम पूर्ण करण्यासाठी संबंधित कंत्राटदारास वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला असून माहे सप्टेंबर, २०२१ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिंतूर (जि.परभणी) नगरपालिकेत कर्मचाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने भरती करण्यात आल्याबाबत

**(५०) * ८१४५ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) नगरपालिकेतील विविध विभागात जिल्हाधिकाऱ्यांची मंजूरी न घेताच कर्मचाऱ्यांची कंत्राटी पध्दतीने मानधनावर भरती करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सेलू येथील उपविभाग अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, सदर प्राप्त अहवालात काय आढळून आले आहे,

(३) तसेच, शासनाच्या नियमानुसार नगरपालिकेत कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करताना जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक असतानाही सदर परवानगी न घेण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

जिंतूर नगरपरिषदेमध्ये सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने २ कर्मचारी व स्थायी समितीच्या मंजूरीने १० कर्मचारी कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आले होते.

(२) उपविभागीय अधिकारी, सेलू यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार मुख्याधिकारी, नगरपरिषद जिंतूर यांनी फक्त २ कर्मचाऱ्यांचे लेखी आदेश केल्याचे दिसते. उर्वरित १० कर्मचाऱ्यांची नियुक्ती विहित पध्दती न अवलंबता झाल्याचे स्पष्ट होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांना संबंधितांचा खुलासा प्राप्त करुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत शासनामार्फत कळविण्यात आले आहे.

(३) नगरपरिषदेच्या अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी पध्दतीने मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना अत्यावश्यक सेवेतील कामे पूर्ण झाल्यानंतर माहे जून, २०२० मध्ये कामावरुन कमी करण्यात आले आहे. सदर कर्मचाऱ्यांच्या मानधनावरील खर्च नगरपालिका फंडातून करण्यात आला आहे.

तसेच रोजंदारी पध्दतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु कंत्राटी पध्दतीवर कर्मचारी नेमताना जिल्हाधिकारी यांची परवानगी घेण्याबाबत स्थायी आदेशामध्ये नमूद नसल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवाल सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महापालिकेच्या अखत्यारितील अनधिकृत जाहिरात फलकांबाबत

**(५१) * ७०८१ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-वरळी सी-लिंक, मुंबई येथील अनेक जाहिरात फलक अनधिकृत असून फक्त दोनच फलक महापालिकेकडून अधिकृतरित्या लावण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या धोकादायक जाहिरात फलकांचे स्ट्रक्चरल ऑडीट होत नसल्याची बाब दिनांक १४ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, महापालिकेने सदर अनधिकृत जाहिरात फलकांवर कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भविष्यात मोठी जिवितहानी टाळण्यासाठी अशा प्रकारच्या धोकादायक जाहिरात फलकांचे नियमितपणे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वांद्रेकडून सी-लिंक मार्ग वरळीकडे जाताना डाव्या बाजूला २ साईन बोर्ड असून ते मेरीटाईम बोर्डच्या अखत्यारित येतात. सदर साईन बोर्डला बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आलेली नाही.

वरळीकडून सी-लिंक मार्ग वांद्रेकडे येताना १४ अधिकृत जाहिरात फलक असून त्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मे.गोल्ड लाईन व मे.ऑपशन्स यांना परवानगी देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित येणाऱ्या अधिकृत होर्डिंग/आकाश चिन्हांकरीता प्रत्येक परवानाधारकाकडून प्रत्येक दोन वर्षांनी महानगरपालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या संरचना अभियंताचे, जाहिरात फलक सुस्थितीत असल्याबाबतचे स्थैर्यता प्रमाणपत्र घेतले जाते. तद्नंतर जाहिरात फलकाचे नुतनीकरण केले जाते.

(३), (४) व (५) वांद्रेकडून सी-लिंक मार्गे वरळीकडे जाताना डाव्या बाजूचे मेरीटाईम बोर्डच्या अखत्यारितील २ अनधिकृत साईन बोर्ड काढून टाकण्याकरीता महानगरपालिकेमार्फत मेरीटाईम बोर्ड यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

-----------------

## नागपूर शहरातील रस्त्यावर कचऱ्याचे ढिगारे साचून अस्वच्छता वाढल्याबाबत

**(५२) * ७८१९ श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर उपराजधानी असूनही या शहरातील अनेक मार्गावर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिग साचल्याचे दिसून येत असल्यामुळे भविष्यात स्वच्छता मिशनमध्ये नागपूर अग्रक्रमावर येवून साचत चाललेल्या कचऱ्याच्या ढिगामुळे शहरातील अस्वच्छता वाढली असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नागपूर शहरातील रस्त्यावरील कचऱ्याचे ढिग साफ करुन शहर स्वच्छ ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) नागपूर मनपा हद्दीमध्ये, घराघरातून कचरा संकलन व वाहतूक करण्याकरीता दोन एजन्सी कार्यरत आहेत.

या दोन एजन्सीच्या माध्यमातून शहरातील कचरा नियमितरित्या उचलण्यात येत असून, शहरात कोणत्याही भागात कचरा साठून राहणार नाही याची पूर्ण दक्षता घेण्यात येते.

या सर्व कार्यवाहीवर देखरेख ठेवण्यासाठी झोननिहाय, जमादार व स्वच्छता निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यांच्यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी स्वच्छता अधिकारी कार्यरत आहेत. ही सर्व कामे सहायक आयुक्त यांच्या नियंत्रणात करण्यात येतात.

अपवादात्मक परिस्थितीत जसे की, एजन्सीच्या कर्मचाऱ्यांचा संप असेल तर, अशा परिस्थितीत सुध्दा महानगरपालिकेच्या यंत्रणेव्दारे किंवा पर्यायी व्यवस्थेव्दारे शहरातील कचऱ्याचे ढिगारे त्वरेने उचलण्याची कार्यवाही महापालिकेकडून केली जाते.

-----------------

## मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांचा विशेष भत्ता बंद केल्याबाबत

**(५३) * ७२०६ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेतील रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रुपये ३००/- देण्यात येणारा विशेष भत्ता दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी पासून बंद करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विशेष भत्ता दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत सुरु ठेवावा अशी मागणी करणारे निवेदन विविध संघटनांनी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर भत्ता पुर्ववत सुरु ठेवण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) कोरोना-१९ च्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेल्या टाळेबंदीच्या काळात लोकल सेवा व हॉटेल्स बंद असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतील कार्यरत कामगार/कर्मचारी/अधिकारी यांना कामाच्या ठिकाणी जाण्या-येण्यासाठी व दैनंदिन जेवण, खाणे याकरीता प्रतिदिन प्रतिकर्मचारी रुपये ३००/- इतका भत्ता दिनांक २३/०३/२०२० पासून सुरु करण्यात आला होता.

तथापि, दिनांक १५/०६/२०२० पासून लोकल रेल्वे सेवा सुरु करण्यात आली असून, सद्य:स्थितीत दोन्ही मार्गांवर लोकल सेवा सुरु आहे. तसेच, मुंबई व मुंबई बाहेरील प्रवाशांसाठी बेस्ट व राज्य परिवहन मंडळाच्या बस गाड्याही सुरु आहेत.

तसेच, राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रेस्टॉरंट व हॉटेल्स दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० पासून सर्व नागरिकांसाठी खुली करण्यात आली आहेत. सबब, बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा वाहतुकीचा व जेवण, खाणे यांचा प्रश्न निकाली निघाला असल्यामुळे प्रतिकर्मचारी देण्यात येणारा दैनंदिन भत्ता दिनांक ०१/०१/२०२१ रोजीपासून बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईच्या उभारणीसाठी शेतकऱ्यांकडून संपादित केलेल्या जमिनींचा मावेजा अदा करण्याबाबत

**(७४) * ७७४१ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईच्या उभारणीसाठी शासनाने ठाणे, पनवेल उरण इत्यादी तालुक्यातील सुमारे ३४४ चौरस कि.मी. चा भुभाग अधिसूचित केल्यानंतर सिडकोच्या माध्यमातून येथील सुमारे १७ हजार हेक्टर जमीन संपादित करुन एक नियोजित शहर बसविण्याची जबाबदारी शासनाने सिडकोवर सोपवून सन १९९४ मध्ये सर्व प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंड देण्याची योजना राबविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमीन संपादनातील प्रकल्पग्रस्तांना मोबदला दिल्यानंतर जमिनीचा वाढीव मोबदला अर्थात मावेजा मिळावा अशी मागणी प्रकल्पग्रस्तांकडून करण्यात आल्यामुळे मावेजापोटी सिडकोला सुमारे २ हजार कोटी रुपये अदा करावे लागले असून अदा करण्यात आलेली रक्कम फार मोठी असल्याकारणास्तव सिडकोच्या प्रकल्पावर त्याचा परिणाम होत

असल्यामुळे उक्त रक्कम शासनाने अदा करावी किंवा कसे याबाबत निर्णय घेण्याची विनंती दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास सिडकोचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी नगर विकास विभागाला पत्र पाठवून केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमिनीच्या वाढीव मोबदल्याबाबत सिडकोकडे असलेल्या हजारो प्रलंबित प्रकरणामुळे नवी मुंबई परिसरातील पनवेल व उरण इत्यादी ठिकाणच्या हजारो गृहनिर्माण संस्थाना ओ.सी. प्राप्त झालेल्या असतानाही गृहनिर्माण संस्था स्थापन करणे, कन्व्हेशन डिड करणे, फायनल ऑर्डर, सिडको ट्रॉन्सफर इत्यादी प्रश्नांबाबत अडचणी निर्माण झाल्यामुळे अधिकृत गृहनिर्माण संस्थामधील रहिवाश्यांची फसवणूक होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी नुसार नगर विकास विभागास पाठविलेल्या पत्राच्या अनुषंगाने आढावा घेतला आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त परिसरातील अधिकृत असलेल्या हजारो गृहनिर्माण संस्थाच्या अडचणी दूर होण्याकरीता तसेच प्रकल्पग्रस्तांचे हित जपले जावे याकरीता निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सिडको महामंडळाने नवी मुंबई प्रकल्पाच्या विकासासाठी संपादित जमिनीच्या प्रकल्पग्रस्तांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने दिनांक ०६/०३/१९९० व दिनांक २८/१०/१९९४ च्या शासन निर्णयान्वये १२.५% योजना मंजूर करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंडांचे वाटप करण्यात येते.

(२) हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोरील रिट याचिका क्र. २४७४/२०१७ (विभागीय आयुक्त, कोकण वि. श्री.सुरेंद्र सोमाणी) च्या सुनावणी दरम्यान भूसंदर्भ क्र. १३८/९० मौजे रोडपाली ता.पनवेल मध्ये मा.प्रधान जिल्हा न्यायाधीश, रायगड अलिबाग यांनी दिनांक ६/०८/२०१६ च्या निवाडा आदेशाने मंजूर केलेली वाढीव मोबदला रक्कम जिल्हा न्यायालय, रायगड येथे जमा

करण्याच्या अनुषंगाने सिडकोच्या दिनांक ०७/०३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार मौजा रोडपाली, ता.पनवेल येथील संपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याच्या अनुषंगाने जिल्हा न्यायालय, अलिबाग यांचा न्याय निर्णय व विभागीय आयुक्त, कोकण यांचे आदेश विचारात घेऊन वाढीव मोबदल्याची रक्कम शासन निर्णय दिनांक १२/०२/२००८ नुसार सिडकोने मा.न्यायालयात जमा करण्याबाबत दिनांक ०५/०४/२०१७ रोजी निर्देश देण्यात आले आहेत.

नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित जमिनीच्या बदल्यात सिडकोकडून प्रकल्पग्रस्तांना सन २००६ ते जानेवारी, २०२१ या कालावधीत वाढीव मोबदला एकूण रक्कम रुपये २४८८,१७,०३,६८७/- वितरित करण्यात आला आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

गृहनिर्माण संस्थांच्या भूखंडाबाबत न्यायालयीन दावा प्रलंबित असल्यास गृहनिर्माण संस्थांच्या नावे भूखंड हस्तांतरण आदेश/ अभिहस्तांतरण/अंतिम आदेश या सेवा आवश्यकतेनुसार सिडकोच्या धोरणानुसार भाडेपट्टाशुल्क फरकाची रक्कम व त्यानुषंगाने अतिरिक्त भाडेपट्ट्याची रक्कम संबंधित गृहनिर्माण संस्थेने अदा केल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येते.

तथापि, ज्या प्रकरणामध्ये उक्त रक्कम भरण्यास संस्था तयार नसेल किंवा भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम १८,२८ व २८-अ खालील दावे प्रलंबित असतील अशी प्रकरणे स्थगित ठेवण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यात आर्थिक तोट्यात असलेल्या बेस्ट उपक्रमाची विकासकांकडे थकबाकी असल्याबाबत

**(५५) * ६८११ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक तोट्यात असलेल्या बेस्ट उपक्रमाचे विकासकांकडे सुमारे ३२० कोटींची थकबाकी असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त थकबाकी वसुल करण्यास बेस्ट उपक्रमाने गत १२ ते १३ वर्षे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू थकबाकी वसुल न करण्याची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त थकबाकी तातडीने वसुल करून बेस्टला आर्थिक तोट्यातून बाहेर काढण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बेस्ट उपक्रमाची विकासकांकडे एकूण रुपये १६०.०९ कोटी इतकी थकबाकी असल्याचे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

(२) बेस्ट उपक्रमामार्फत विकासकांकडून आतापर्यंत रुपये ५२९.६८ कोटी इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी वैधानिक परवानग्या मिळवण्याकरीता झालेल्या उशीरामुळे कामाच्या पूर्ततेकरीता विलंब झाला आहे. त्यामुळे व्याजदराच्या अनुषंगाने येणे असणाऱ्या रकमांबाबत व मुख्यत: दंडाच्या रकमांबाबत विकासकांचे बेस्ट उपक्रमाशी मतभेद आहेत.

तथापि, सदर वसुली करण्यासाठी करारातील अटी व शर्तींनुसार सामोपचाराने/लवादामार्फत प्रकरणे निकाली काढण्याकरीता प्रयत्न करण्यात येत असल्याचे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिथवली (ता.वैभववाडी) व चिंचवली (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील सुखनदीवरील पूलाच्या प्रलंबित कामाबाबत

**(५६) * ६८९० श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिथवली (ता.वैभववाडी) आणि चिंचवली (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या दोन गावाच्या दरम्यान असलेल्या सुखनदीवर पूल बांधण्यात यावा म्हणून पंचक्रोशीतील ग्रामस्थांची गत ४० वर्षापासूनची मागणी विचारात घेऊन तत्कालीन शासनाने माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान उक्त पूलाच्या बांधकामास मंजूरी देवूनही बांधकामास सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजापूर तालुक्यातील अनेक गावातील प्रवाशांना चिंचवली येथे कोकण रेल्वेने उभारलेल्या खारेपाटण रोड रेल्वे स्टेशनवर येण्यासाठी १२ ते १५ कि.मी.चा वळसा घालून यावे लागत असल्यामुळे त्या परिसरातील अनेक गावातील ग्रामस्थांना दळणवळणासाठी अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असून प्रवाशांना नाहक दगदग, वेळेचा अपव्यय तसेच आर्थिक भूर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पूलाच्या बांधकामास मंजूरी मिळून रुपये ५ कोटीच्या निधीची अर्थसंकल्पात तरतूद केलेली असतानाही प्रत्यक्षात पूलाचे कामास सुरूवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तिथवली-चिंचवली या दोन गावाच्या दरम्यान सुखनदीवर पूल बांधण्याचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याचेदृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) हे खरे नाही.

सदर पुलाचे काम अद्याप कोणत्याही योजनेत अंतर्भूत करण्यात आलेले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

अनेक गावातील प्रवाशांना चिंचवली येथे कोकण रेल्वेने उभारलेल्या खारेपाटण रोड रेल्वे स्टेशनवर येण्यासाठी २० कि.मी.चा वळसा घालून यावे लागत आहे.

(३), (४) व (५) प्रश्नाधीन पुलाबाबत निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## बदलापूर पश्चिम (जि.ठाणे) येथील मांजर्ली स्मशानभूमीत डिझेल शवदाहिनी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५७) * ७९९३ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर पश्चिम (जि.ठाणे) येथील मांजर्ली स्मशानभूमीच्या आवारात असलेली महापालिकेची डिझेल शवदाहिनी महिन्याभरापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शवदाहिनी बंद असल्याने नागरिकांना पारंपारिक पध्दतीने अंत्यसंस्काराचा पर्याय स्वीकारावा लागत असल्यामुळे मोठी रक्कम, वेळ आणि श्रम खर्च होत असल्याने नागरिकांची अडचण होवून अनेकदा पारंपारिक स्मशानात गर्दी असल्याने शव घेऊन जागा रिकामी होण्याची वाट पहावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डिझेल शववाहिनी दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी मुख्याधिकारी, कुळगाव-बदलापूर नगरपालिका यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मांजर्ली स्मशानभूमीत डिझेल शवदाहिनी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हद्दीतील मांजर्ली येथील स्मशानभूमीच्या आवारात सन १९९९ पासून कार्यरत असलेली डिझेल शवदाहिनी दिनांक २५/१२/२०२० रोजी नादुरुस्त झालेली होती, ही बाब खरी आहे.

(२), (३) व (४) शवदाहिनी नादुरुस्त असलेल्या कालावधीमध्ये नागरीकांना अडचणींचा सामना करावा लागला, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, नादुरुस्त झालेली सदरची शवदाहिनी दुरुस्त करुन घेण्यात आली असून दिनांक ०८/०२/२०२१ पासून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महापालिकेच्या प्राथमिक शाळेमधील निवृत्त शिक्षकांना पेन्शन मिळण्याबाबत

**(५८) * ७७८७ श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महापालिकेच्या प्राथमिक शाळेमधील निवृत्त शिक्षकांना आपल्या हक्काच्या पेन्शनसाठी अधिकाऱ्यांकडे विनंत्या कराव्या लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवृत्त प्राथमिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी कल्याण संस्थेच्या सदस्यांनी यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निवृत्त शिक्षकांना पेन्शन देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणी महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडून सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके तपासली जातात.

सदर पुस्तके तपासताना कर्मचाऱ्यांच्या रूजू दिनांकापासूनच्या सर्व नोंदी, काही आक्षेप/लेखा आक्षेप, वेतनत्रुटी यांची पूर्तता करण्यासाठी विलंब होतो.

या सर्व बाबींची पूर्तता करण्यास विलंब होत असल्याने अशी पेन्शन प्रकरणे प्रलंबित आहेत, ही वस्तुस्थिती आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

अशा प्रलंबित प्रकरणांबाबत निवृत्त प्राथमिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी कल्याण संस्था या संघटनेने दिनांक ०९/०२/२०२१ रोजी पुणे महानगरपालिकेस निवेदन दिलेले आहे.

अशा प्रकरणी त्रुटींची पूर्तता होईपर्यंत अपेक्षित सेवानिवृत्तिवेतनाच्या ९० टक्के एवढे सेवानिवृत्तिवेतन सुरू करण्यात आलेले असून, त्रुटींचे निराकरण केल्यानंतर अनुज्ञेय सेवानिवृत्तिवेतन देण्यात येते, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे येथील सन २०१८ पासून दिनांक ३१/०१/२०२१ अखेर एकूण १८८ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून, त्यापैकी ६४ कर्मचाऱ्यांना नियमित सेवानिवृत्तिवेतन सुरू करण्यात आले आहे.

याबाबत आढावा घेण्यात आलेला असून सर्व प्रलंबित प्रकरणे तातडीने पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यात येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतन विषयक बाबी प्राधान्याने हाताळून विशेष पथक नेमून प्रलंबित १२४ प्रकरणांत त्वरीत कार्यवाही करून अनुज्ञेय निवृत्तिवेतनाची पूर्ण रक्कम प्रदान करण्याचे प्रयत्न करावेत, तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत १ वर्ष आधिपासून सेवापट तपासणीस सुरूवात करावी, अशा सूचना आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना दिनांक ०१/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## नांदेड शहरात वाहतूकीस अडथळा ठरत असलेले विजेचे खांब निष्कासित करण्याबाबत

**(५९) * ६७३२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील अनेक रस्त्यांचे काही वर्षापूर्वी मजबूतीकरण व रुंदीकरण करण्यात आले आहे मात्र, अनेक रस्त्यांवरील विजेचे खांब स्थलांतरित न केल्यामुळे ते वाहतूकीसाठी अडथळा ठरत असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वाहतूकीस अडथळा ठरणारे विजेचे खांब स्थलांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध मुख्य रस्त्यांमध्ये व अंतर्गत रस्त्यांमध्ये विद्युत पोल असल्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहे, हे खरे आहे.
(२) नांदेड वाघाळा महानगरपालिकेने JNNURM व नगरोत्थान या योजनेंतर्गत सन २००८ पासून शहरातील मुख्य रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेतले होते. सदर काम करताना विद्युत खांब व ट्रान्सफार्मर हे अडथळा ठरत असल्यामुळे ते स्थलांतरीत करण्याबाबत महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला आहे.

कामाची तातडी लक्षात घेता महानगरपालिकेने निविदा मागवून सदर काम स्वखर्चाने पूर्ण केले असून त्यासाठी रुपये ११.४२ कोटी खर्च झाला आहे.

शासन परिपत्रक दिनांक ९/०८/१९९८ मधील तरतुदीनुसार विद्युत खांब व ट्रान्सफार्मर स्थलांतरीत करण्यासाठी झालेला खर्च विद्युत वितरण कार्यालय व महानगरपालिका यांनी समप्रमाणात करणे अभिप्रेत आहे. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कार्यालयाकडे ५०% रकमेची महानगरपालिकेने मागणी केली आहे.

वेळोवेळी महानगरपालिका निधीतून वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे विद्युत खांब स्थलांतरीत करण्यात आले आहेत. तसेच सन २०२१-२०२२ करीता या कामासाठी महानगरपालिकेने जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांच्याकडे निधीची मागणी केली असल्याबाबत नांदेड वाघाळा महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मागाठाणे (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर) येथील गृह संकुलातील रस्ता बंद करण्यात आल्याबाबत

**(६०) * ७८४४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मागाठाणे (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर), येथील न.भू. क्रमांक २१७, २१७/१ ते ५८, २१८, २१८/१ ते ३२ या मिळकतीच्या क्षेत्रावर वसलेल्या संकुलातील इमारत क्र. ७ आणि इमारत क्रमांक ६ मधील रस्ता सन २००३ पासून संकुलातील वाहनांसाठी आणि रहदारीसाठी खुली होती. परंतु सदर रस्ता सिंधुदुर्ग सहकारी गृहनिर्माण संस्थेने बेकायदेशीररित्या लोखंडी गेट टाकून बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अभियंता (झो.पु.पा.) यांचा सन १९९४, १९९८, २००३, २०१७ व २०१८ या वर्षांच्या मंजूर अभियान्यास आराखड्यात (Sanctioned Layout Plan) सदर रस्ता दाखविण्यात आला असूनही सदर मार्ग लोखंडी गेटव्दारे बंद करण्याची कारणे काय आहेत व उक्त मार्ग कोणाच्या आदेशान्वये बंद करण्यात आला आहे,

(३) तसेच, उक्त ठिकाणी आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास सदर गेटमुळे बचाव कार्यात अडथळा निर्माण होण्याची शक्यता विचारात घेवून जेष्ठ नागरिक, रूग्ण, महिला व लहान मुलांना दुरच्या रस्त्यावरून वळसा घालून जावे लागत असल्याची समस्या विचारात घेता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर रस्त्यावरील लोखंडी गेटसंदर्भात सद्‌गुरू मिलेनियम टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्थेसह संकुलातील इतर संस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांना माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदन देण्यात आले असूनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड :** (१) होय, हे खरे आहे.

सदर बाबतीत सद्‌गुरु मिलेनियम टॉवर सह.गृह.नि. संस्थेच्या दिनांक २२/०९/२०२० रोजीच्या पत्रानुसार तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) योजनेच्या सुधारित मंजूर अभिन्यास आराखड्यानुसार इमारत क्र.६ व इमारत क्र.७ मधील रस्त्यावर कोणतेही लोखंडी गेट प्रस्तावित नाही व सदर लोखंडी गेट बसविण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत कोणतीही परवानगी अथवा निर्देश विकासक/गृहनिर्माण संस्थेस देण्यात आलेले नाहीत.

(३) व (४) सदर बाबतीत विकासक व वास्तुविशारद यांचा दिनांक २३/११/२०२० च्या पत्रान्वये खुलासा मागविलेला आहे आणि तसेच दिनांक २२/०२/२०२१ रोजी स्मरणपत्राव्दारे पुन:श्च कळविण्यात आलेले आहे. तसेच सदर तक्रारीबाबत कार्यवाही करण्यासाठी दिनांक २२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सिंधुदुर्ग गृहनिर्माण संस्थेसदेखील कळविण्यात आलेले आहे.

(५) मंजूर अभिन्यासात विकासकामार्फत सदर अनधिकृत बांधकामावर कारवाई होईपर्यंत योजनेतील विक्री घटकाच्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, असे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाघोळी (ता.हवेली, जि.पुणे) येथील वाघेश्वर मंदिर ते श्रेयस गार्डन रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(६१) * ७६३३ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोळी (ता.हवेली, जि.पुणे) येथील वाघेश्वर मंदिर ते श्रेयस गार्डन रस्त्याच्या रुंदीकरणाचे, सुशोभिकरणाचे व फुटपाथचे काम पूर्ण करण्याचा कालावधी संपूनही काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाकरीता अकरा कोटी रुपयांचा निधी खर्च करुनही रस्त्याच्या रुंदीकरणाचे, सुशोभिकरणाचे व फुटपाथचे काम अपूर्णावस्थेत असल्याने नागरिकांना, वाहनधारकांना गैरसोईचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने दोषींविरुध्द कारवाई करुन उपरोक्त काम तातडीने पूर्ण करण्याकरीता शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नाधीन विषय हा पुणे-नगर राष्ट्रीय महामार्ग ७५३ (फ) या रस्त्यावरील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेल्या श्री.वाघेश्वर, आव्हाळवाडी व केसनंद या तीन संगमस्थान सुधारणा करण्याच्या कामाबाबत आहे.

सदर कामाच्या रुंदीकरणात अडथळा ठरणाऱ्या विद्युत खांब, फिडरपिलर, केबल स्थलांतरीत करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याने काही ठिकाणी फुटपाथचे व रुंदीकरणाचे काम अंशतः बाकी आहे.

तसेच सदरचे काम माहे मार्च ते ऑगस्ट, २०२० या कालावधीत कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सुमारे ५ महिने बंद ठेवावे लागले. त्याचप्रमाणे लॉकडाऊन कालावधीत कामगार व साधन सामुग्रीचा तुटवडा यामुळे उर्वरित कामामध्ये सातत्य राखण्यासाठी अडचणी उद्भवल्या. यास्तव सदर काम पूर्ण होण्यास विलंब झाला.

सदर काम दिनांक १५/०३/२०२१ रोजीपर्यंत पूर्ण करण्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे.

-----------------

## अकोला राष्ट्रीय महामार्ग बायपासचे कामात डिपीआरचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(६२) * ६९३८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेंतर्गत राष्ट्रीय महामार्ग एन.एच.आय. तर्फे अकोला रेल्वे स्टेशन ते अशोक वाटीकापर्यंत फ्लायओवर, सबवे तसेच शिवणी पासून रिधोरा बायपासचे कामात डिपीआरचे उल्लंघन होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे,
(२) असल्यास, सदर काम निविदेच्या निकषाप्रमाणे न करता चूकीच्या माध्यमातून दुसऱ्याकडून (जेव्ही) करून तसेच एकाच निविदाधारकाला देत असल्याची बाब सुध्दा निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण :** (१) सदर कामे केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आहेत, हे खरे नाही.

सदर कामे डिपीआर प्रमाणे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या नियमांनुसार व सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेनुसार करण्यात येत आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर कामे ही Request for Proposal (RFP) प्रमाणे व त्यातील JV च्या शर्तीप्रमाणे अवार्ड करण्यात आली आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.